# अरुणोदय



केतकी शहा

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# अरुणोदय

कादंबरी

लेखिका

केतकी शहा

# अरुणोदय

लेखिका : केतकी शहा
+91(8007487799)
ketakee.shah@gmail.com
P-303, श्रीनिवास ग्रीनलँड काऊंटी, मानाजी नगर, नऱ्हे, पुणे -४११०४१

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

प्रकाशन प्रतिष्ठान ई साहित्य :
www. esahity. com
esahity@gmail. com
प्रकाशन : १० डिसेंबर २०१७
©esahity Pratishthan®2017

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## अरुणोदय

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिटं

१ मिनिट : हे पुस्तक तुम्हाला कसे वाटले ते लेखिकेला कळवा.

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेलकरून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

## नमस्कार रसिक वाचकहो !!



माझ्या पहिल्यावहिल्या "अबोली" या कथेला आपणा सर्वांचा भरभरून प्रतिसाद मिळाला.. आपण दिलेल्या उदंड प्रेम, आशीर्वाद आणि प्रतिसादाबद्दल मी आपणा सर्वांची आभारी आहे.

आपण रसिक वाचकांनी घेतलेली दखल आणि दिलेले प्रोत्साहन मला नवनवीन विषयांवर लेखन करण्यास.. न पाहिलेल्या क्षितिजाला गवसणी घालण्यास प्रोत्साहित करत आहे.. त्यातूनच या माझ्या दुसऱ्या पुस्तकाचा जन्म झाला..

याही प्रयत्नाला आपणा सर्वांचे भरभरून प्रेम व आशीर्वाद लाभेल अशी आशा करते..

माझ्या कथेला तुम्हा रसिक वाचकांपर्यंत पोहचवण्यास साहित्य सेतूचे काम करणाऱ्या ई साहित्य टीम आणि सुनील सामंत यांची मी मनःपूर्वक आभारी आहे..

-केतकी शहा

## नमस्कार रसिक वाचकहो!!

माझे नाव केतकी विजयानंद शहा. मी पुणे येथे आय टी क्षेत्रात कार्यरत आहे.

मी लहानपणापासूनच वाचन आणि लेखन हे माझे छंद जोपासले आहेत.. त्यांना वेळोवेळी ज्येष्ठ विचारवंतांच्या, साहित्यिकांच्या विचारांचे खतपाणी देऊन.. त्यांची योग्य निगा राखून त्यांना फुलवत ठेवलेले आहे. बहिणाबाई, पु. ल. देशपांडे, व. पु. काळे, ग. दि. माडगूळकर, वि. वा. शिरवाडकर यांसारख्या साहित्य शिरोमणीं कडून मला बरेच शिकण्यास मिळाले.. त्यांच्या साहित्यरूपी वटवृक्षाच्या सावलीत मी वाढले..

खरे तर लेखन आणि वाचन यांच्यासाठी छंद हा शब्द लहानपणाकरिता वापरता येईल.. आता हे दोन्हीही माझ्या आयुष्याचा अविभाज्य भाग आहेत..

हातात लेखणी आली की शब्द कागदावर आपोआप उमटू लागतात.. ते शब्द बऱ्याचदा काव्य, कथा, लेख स्वरूपात कागदावर आपले अस्तित्व निर्माण करतात..

मला निरनिराळ्या लेखकांच्या लेखनशैलीचा अभ्यास करायलाही आवडतो.. त्यातून फार वैविध्यपूर्ण गोष्टी शिकायला मिळतात..

मराठी माझी मायबोली आहे.. मराठी वाचन आणि लेखन संस्कृती जपण्याकरिता मी सतत प्रयत्नशील असेन..



आपण रसिक वाचकही ती जपण्यास..वृद्धिंगत करण्यास हातभार लावाल अशी आशा करते..


-केतकी शहा

+91(8007487799)

ketakee.shah@gmail.com

P-303, श्रीनिवास ग्रीनलँड काऊंटी,

मानाजी नगर, नऱ्हे, पुणे -४११०४१

आयुष्याच्या समुद्राला कितीही मोठी भरती आली..

त्याने कितीही आक्राळ विक्राळ रूप धारण केले

तरी आपल्या माणसाची साथ न सोडणाऱ्या ,

त्याला खचून न जाऊ देता

पूर्ववत व्हायला मदत करणाऱ्या

सर्व जीवाभावाच्या नात्यांना अर्पण!!

-केतकी शहा

# अरुणोदय

# प्रकरण १

कॅलिफ़ॉर्नियाचे सॅनफ्रान्सिस्को विमानतळ.. त्याचे ते भव्य.. प्रशस्त आवार.. शिस्तबद्ध पद्धतीने चाललेल्या लोकांच्या हालचाली.. चेक इन.. चेक आऊटसाठी लागलेल्या लोकांच्या रांगा.. आपापले सामान घेण्यासाठी थांबलेले लोक.. सर्व ठिकाणीच शिस्त.. एवढी गर्दी असूनही कुठलाही धुसमुसळेपणा जाणवत नव्हता.. .

अरूण अमेरिकेत नुकताच लॅन्ड झाला होता.. तिथली शिस्त, स्वच्छता, नीटनेटकेपणा पाहून अरुणला आश्चर्य वाटले.. विमानतळ तर एवढे मोठे आणि प्रशस्त होते की अरुणला कळत नव्हते कोणत्या दिशेला जायचे.. त्याचा चांगलाच गोंधळ उडाला होता..

कनेक्टींग फ्लाईटने आल्यामुळे आधीच त्याला खूप थकवा आला होता.. भारत ते अबू धाबी.. अबू धाबीमधे दोन तासांचा हॉल्ट होता.. नंतर अबू धाबी ते सॅनफ्रान्सिस्को.. असा प्रवास करत तो विमानतळावर उतरला होता..

त्यावर हे विमानतळ काही कोणत्या भूलभूलैय्यापेक्षा कमी वाटत नव्हते.. कसा बसा विचारत विचारत.. वाट काढत.. तो आपले सामान घेण्यासाठी सामानाच्या पट्ट्या जवळ येऊन उभा राहिला.. येत असलेली प्रत्येक बॅग बघत होता.. ती आपली नसल्याचे लक्षात येताच त्याचा हिरमोड होत होता..

तसाच तो जवळ जवळ अर्धा तास तेथे उभा होता.. पण त्याचे सामान काही पट्ट्यावर आलेच नाही.. आता मात्र त्याच्या सहनशक्तीचा अंत होत चालला होता.. त्याला वेगळीच शंका येऊ लागली होती.. म्हणतात ना की मन चिंती ते वैरी न चिंती तसे काहीसे अरुणचे झाले होते..

त्याला आता आपले सामान गहाळ झाल्याची शंका येऊ लागली होती.. त्याने आधीपण या विमानतळावरून सामान हरवणे या प्रकाराबद्दल ऐकले होते.. पण त्याला स्वप्नातही वाटले नव्हते की आपल्या पहिल्या वहिल्या परदेशवारीतच आपल्या बरोबर हे घडेल..

त्या सामानात योगिनीसाठी अबुधाबीवरून आणलेले सरप्राईज गिफ्टही होते.. हॉल्ट होता तेव्हा अरुण इकडे तिकडे वेळ दवडत फिरत असताना त्याला तिच्यासाठी ते गिफ्ट आवडले होते.. भारतातूनही त्याने बरेच काही आणले होते.. पण आता काय सामानच हरवले.. योगिनीला सरप्राईज देण्याऐवजी त्यालाच मोठा शॉक बसला होता..

अरुण अतिशय निराश मनाने एअरपोर्ट ऑथॉरिटी ऑफिसकडे जाण्यास वळला.. पण अजूनही अरुणला या विमानतळाचा फारसा अंदाज आला नसल्यामुळे तो चुकीच्या मजल्यावर पोहोचला.. परत विचारणा.. परत शोध असे करत तो एकदाचा एअरपोर्ट ऑथॉरिटी ऑफिसमधे गेला.. त्याने त्यांच्याकडे रितसर तक्रार नोंदविली..

एअरपोर्ट ऑथॉरिटीजनी घडलेल्या प्रकाराबद्दल अरुणजवळ दिलगिरी व्यक्त केली आणि लवकरात लवकर तपास करून सामान शोधून परत करण्याचे आश्वासन दिले..

पण सामान काही लगेच मिळेल असे अरुणला वाटत नव्हते.. अश्या वेळेस सामान्यतः एक आठवडा तरी लागतोच.. कमीत कमी पाच ते सात दिवस लागतील असे धरून चालायचे..

खांद्यावरची लहानशी बॅग घेऊन अरुण निराश मनाने एअरपोर्ट मधून बाहेर पडू पाहत होता..

पण त्याचा पाय काही निघत नव्हता.. एकीकडे तर सामान हरवल्याची त्याच्या मनाला खूप हुरहूर लागली होती.. दूसरीकडे एअरपोर्टचे सौंदर्य त्याला भुरळ घालत होते..

एअरपोर्ट एवढा प्रशस्त होता.. बहुमजली पंचतारांकित हॉटेलसारखी भव्य अशी ती इमारत वाटत होती.. तिथले सगळेच अगदी लक्षवेधक होते.. बाहेर पडण्याकरीता खूप सारे गेट्स होते.. वर खाली करण्यासाठी रस्त्याप्रमाणे सरळ सोट पायऱ्या नसलेले एस्कलेटर्स होते..

बाहेर पडण्याकरीता जे गेट्स होते ते सतत फिरत होते.. त्यातून एकावेळेस एकच व्यक्ती बाहेर जाऊ शकत होती..

तो बाहेर पडता पडताही मागे वळून परत एअरपोर्टला न्याहाळत उभा राहिला..

वेगळयाच दुनियेत आल्याचा भास अरुणला होत होता.. बराच वेळ भान हरपून तो फक्त सगळे पाहत होता..

# प्रकरण २

योगिनीला येऊन तब्बल अर्धा तास झाला होता.. तिला आश्चर्य वाटत होते की फ्लाईट लॅन्ड होऊन एवढा वेळ झाला तरी हा मुलगा एअरपोर्टमधेच काय करतो आहे..

योगिनी.. मिसेस योगिनी अरुण साठे.. अरूणची बायको.. तिला सहा महिन्यांपूर्वी कामानिमित्त अमेरिकेत शिफ्ट व्हावे लागले होते..

अरूणने आपल्या कंपनीकडे यूके ऐवजी अमेरिकेला ऑनसाइट पाठवण्याची विनंती केली होती.. आणि ती तब्बल सहा महिन्यानंतर मान्य झाली होती.. अरूण अतिशय पुढारलेल्या विचारांचा होता.. बायकोच्या मागे आपण कशाला जावे हा विचारही त्याच्या मनाला शिवला नव्हता..

योगिनी मात्र सुरूवातीला ही ऑफर स्वीकारावी कि नाही या द्विधा मन:स्थितीत होती.. कारण तिला अरूण पासून दूर जायचे नव्हते त्यांच्या लग्नाला फक्त सात महिने झाले होते.. पण अरूणने तिला कनव्हीन्स केले होते कि ही संधी तिच्या करीयरला नवीन कलाटणी देणारी ठरू शकेल..

खूप कनव्हीन्स केल्यानंतर योगिनी अमेरिकेला जायला तयार झाली होती..

त्याच्या सहा महिन्या नंतर आज अरूण इथे आला होता..

तो विचारत विचारत कसाबसा एअरपोर्टच्या जादुई दुनियेतून बाहेर आला आणि त्याने एकदाचा सुटकेचा निःश्वास टाकला..

बाहेर आला तर समोरच योगिनी उभी होती.. त्याला पाहून तिला अश्रू अनावर झाले..

आपण तासभर इथे वाट पाहत उभे आहोत.. काळजीने जीव अर्धा झाला आहे.. हे सर्व ती अरुणला पाहताच एका क्षणात विसरली ..

उन्हाळ्यात अंगाची लाही लाही होत असताना अचानक आभाळ भरून येऊन वळवाचा पाऊस पडू लागावा.. संबंध वातावरणात ओल्या मातीचा दरवळ भरावा.. आणि भूतलावर चैतन्य ओसंडून वहावे तसे काहीसे भाव सध्या अरुणला पाहून योगिनीच्या मनात उमटले होते..

लग्नाला फक्त सात महिने झाले असताना ती त्याला सोडून आलेली होती.. एवढ्या काळानंतर ती त्याला प्रत्यक्ष पहात होती.. ते दररोज व्हिडिओ कॉलवर बोलत असत.. पण तरीही प्रत्यक्ष भेटण्याचा आनंद वेगळाच..

अरुणची मनस्थिती देखील काही वेगळी नव्हती..  दोघेही भावनांच्या सागरात आलेल्या भरतीच्या लाटेवर स्वार होऊन आजूबाजूच्या जगाला काही क्षण परके झाले..

दोघांचा नेत्र संवाद सुरू झाला होतां.. योगिनीने अरूणला घट्ट मिठी मारली.. आत्ता कुठे दोघांना थंडीने भरलेली हुडहूडी कमी झाल्यासारखी वाटले.. दोघेही बंद लोचनांनी एकमेकांचा सहवास अनुभवत होते..

काही काळाने ते दोघे भानावर आले आणि तिथून योगिनी रहात असलेल्या अपार्टमेन्टकडे निघाले.. पेड टॅक्सी केली होती.. टॅक्सी बऱ्यापैकी मोठी आणि कंफर्टेबल होती.. इनोव्हापेक्षा जरा मोठीच असेल..

गाडीमधे हिटर चालू होता म्हणून त्या दोघांना आता हळूहळू थंडी वाजायची कमी होत होती..

अरूणची ही पहिलीच परदेश वारी असल्या कारणाने तो खिडकीच्या काचेमधुन डोळयांना दिसणारे नाविन्य टिपून घेत होता.. इमारती.. घरे.. त्यांचे स्थापत्य.. स्वच्छता.. नीटनेटकेपणा.. भारतापेक्षा वेगळे राहणीमान.. रस्त्यावरील हॉटेलमुळे त्याला तेथील खाद्यसंस्कृतीची झलकही दिसून आली..

अरुणची नजर आता रस्त्यावरील वाहनांवर.. वाहतुकीवर खिळली.. ट्रॅफिक असूनही अगदी शिस्तीत चाललेल्या वाहनांच्या हालचाली.. भारतात चालवतात त्याच्या अगदी विरुद्ध दिशेने रस्त्यावरून चालणारी वाहने.. उलट्या म्हणजे डाव्या बाजूला असलेले वाहनांचे स्टीअरींग.. गाडीच्या हॉर्नचा वापर अतिशय कमी प्रमाणात होत होता.. अगदी नसल्यातच जमा..

अरुणला हे सर्व ऐकून माहीत होते.. पण प्रत्यक्ष अनुभव थोडा नरव्हस करणारा होता.. ड्राइव्हरने पहिल्या वळणावर गाडी वळविली तेव्हा उलट्या दिशेचे वळण असल्यामुळे अरुणला धडकी भरल्या सारखे झाले.. हळूहळू गाडी जसे अंतर पार करत होती तसा अरुण त्या नव्या गोष्टींशी जुळवून घ्यायचा प्रयत्न करत होता.. पण तो परदेशातील पहिला प्रवासाचा अनुभव फारच वेगळा होता..

त्याने शेजारी पाहिले.. योगिनीचा डोळा लागला होता..

योगिनी मात्र अरुण खूप दिवसांनी भेटल्यामुळे त्याच्या खांद्यावर डोके टेकवून शांत पडली होती.. डोक्यात विचार चक्र फिरत होते..  काय काय पार करत ती इथेपर्यंत आली होती.. महाविद्यालय.. प्रशांत.. अरूण.. लग्नानंतरचा तो कठीण काळ.. सगळेच तिच्या वर्तमाना भोवती गिरक्या घेत असल्या सारखे तिला वाटले..

# प्रकरण ३

योगिनी महाविद्यालयात शिकत होती..

योगिनी आणि प्रशांत कॉलेजमधे लव बर्ड्स म्हणून फेमस होते.. योगिनी प्रशांतला १ वर्ष जूनिअर होती..

महाविद्यालयाचा संपूर्ण परिसरात त्यांच्या प्रेम प्रकरणाची चर्चा असायची.. त्यांचे बाईक वरून एकत्र येणे.. आले की ब्रेकफास्ट.. चहा.. गप्पा.. मग ते दोघे आपापल्या क्लास रूममधे जात असत लंच टाइम पर्यंत.. परत लंच एकत्र.. परत चार वाजेपर्यंत लेक्चर्स.. मग परत त्यांची संध्याकाळ कधी कॅन्टीन.. कधी कट्टा.. कधी लायब्ररी.. कधी रस्त्यावर हातात हात घालून नुसतीच भटकंती.. कधी मनसोक्त गप्पा.. तर कधी फक्त शांततेत स्वतःला हरवून एकटक कुठे तरी बघत बसणे.. काही निश्चित असा पॅटर्न नव्हता.. पण दिवसातील जवळ जवळ ४ ते ५ तास ते दोघे एकत्र असत..

आज १३ सप्टेंबर.. योगिनीसाठी खास दिवस.. तिचा वाढदिवस.. ती आज कॉलेजला छान तयार होऊन आली होती.. जीन्स आणि त्यावर छान व्हाईट कलरचा टॉप.. त्यावर पिंक पेटल्स विखुरलेल्या होत्या.. अगदी फुलराणीप्रमाणे दिसत होती ती..

तिच्याकडे पाहून वाऱ्यावरती गुलाबाच्या पाकळया अलवार उडत सर्वत्र सुगंध दरवळवत येत असल्याचा भास होत होता.. ती कॅन्टीन मध्ये शिरली तेव्हा तिथला संबंध परिसर तिच्या परफ्यूमच्या सुगंधाने दरवळून निघाला.. सगळयांचे लक्ष तिच्या आकर्षक रूपाने वेधून घेतले.. तिच्या रूपाच्या गारुडाने आजूबाजूच्या सर्वांना मोहिनी घातली होती..

ती मात्र आपल्याच तोऱ्यात.. आपल्याच तंद्रीत आजूबाजूच्या जगाचा विसर पडल्या सारखा प्रशांतलाच शोधत होती..

प्रशांत दिसला पण तो नेहमीप्रमाणेच वागत होता.. योगिनीसाठी आजचा दिवस खूप खास आहे असे काहीच त्याच्या वागण्यामधुन जाणवत नव्हते.. इतर दिवसांसारखाच आजचाही दिवस असेच त्याचे वागणे होते.. “काय मस्त टॉप आहे.. लुकिंग चार्मिंग स्वीटहार्ट” प्रशांत ने तिची अगदी मोघम शब्दांत स्तुती केली..

योगिनी खूप ब्लश करत होती.. प्रशांत काहीतरी वेगळ्या-खास पद्धतीने विश करेल असे तिला वाटत होते.. पण तिचा हिरमोड झाला.. प्रशांतने नाश्त्यासाठी नेहमीप्रमाणे त्यांचे आवडते ईडली सांबार मागविले.. नाश्ता-चहा संपवून ते दोघे आपापल्या क्लासमधे गेले..

संपूर्ण दिवस योगिनीला तिच्या सर्व क्लासमेटस ने विश केले.. खूप साऱ्या कॉम्प्लिमेंट्स मिळाल्या तिला.. साहजिकच होते ते.. ती अगदी फुलराणीसारखी दिसत होती.. सकाळी घरातून बाहेर पडताना आईने तिचे औक्षण केले होते.. तोंड गोड करूनच ती कॉलेजला आली होती.. तरीहि योगिनीला आपला आनंद अपूर्ण वाटत होता..

तिला आतून कसलीशी कमतरता जाणवत होती.. "प्रशांत कसा विसरला माझा बर्थडे.. सगळयांनी विश केले मला.. ज्याच्यासाठी आपण एवढे तयार होऊन आलो.. त्याच्या तर लक्षात पण नाहीय.. स्ट्रेंज यार"

योगिनीचा चेहरा अतिशय रेखीव.. आणि डोळे हरिणीसारखे पाणीदार आणि बोलके होते.. तिचे डोळे हा तिच्या भावनांचा आरसा होता.. तिच्या मनात काय चालू असावे याचा बऱ्याचदा त्रयस्थही अंदाज बांधू शकत असायचे.. मग ते प्रशांत पासून कसे लपून राहील..

प्रशांतला तिच्या मनात चाललेली चलबिचल कळत होती.. जाणवत होती.. तो या जाणूनबुजून सुरु केलेल्या सफरीचा मौनरूपी ऐरावतावरून मनसोक्त आनंद घेत होता..

कॉलेज सुटले आणि आज जरा काम आहे सांगून प्रशांत गडबडीत निघून गेला.. आज योगिनीला घरापर्यंत सोडायला देखील गेला नाही.. योगिनी क्षणभर स्तिमित होऊन प्रशांतच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत तिथेच उभी होती..

योगिनी ऑटो करून घरी निघाली.. अजूनही ती अस्वस्थच होती.. काही केल्या तिला चैन पडत नव्हते.. कशातच मन लागत नव्हते..

घरी येऊन फ्रेश होऊन ती गॅलरीमध्ये येऊन झोपाळ्यावर बसली.. हळूहळू झोके घेत बाहेर बघत बसली होती..

आई तिच्याशी बोलत होती.. पण तिचे कशातच लक्ष लागत नव्हते.. शून्यात हरवल्यासारखी सुन्न बसली होती..

# प्रकरण ४

एखादा तास असाच गेला असावा..

संध्याकाळचे साडे सात वाजले होते.. दरवाजावरची बेल वाजली.. योगिनीची आई कामात होती.. तिने योगिनीला आवाज दिला.. "योगी.. बघ बेटा दरवाज्यावर कोण आहे" योगिनीची गॅलरी मधून उठण्याची अजिबात इच्छा नव्हती.. पण नाईलाजास्तव ती उठली आणि तिने अनिच्छेनेच दरवाजा उघडला..

दरवाजा उघडताच तिला भला मोठा लाल गुलाबाच्या फुलांचा गुच्छ दिसला.. अर्थात तो कोणी तरी पकडला होता.. पण फुलांच्यामुळे ती व्यक्ती योगिनीला दिसली नाही..

अचानक गुच्छ बाजूला झाला आणि "हॅपी बर्थडे माय स्वीटहार्ट" या प्रशांतच्या शुभेच्छांचा तिच्यावर वर्षाव झाला..

कसे वाटले माझे सरप्राईज.. बरा करतो ना मी अभिनय!

असे म्हणत प्रशांतने डोळा मारला..

योगिनी खूप निखळ आणि अगदी मनापासून हसली.. तिचा आनंद गगनात मावत नव्हता.. संध्याकाळपासून तिला जो अस्वस्थपणा.. निरुत्साह जाणवत होता तो कुठल्या कुठे पळून गेला होता.. त्याची जागा आता उत्साह.. आंनद.. अशा उत्स्फूर्त भावनांनी घेतली..

प्रशांतला या सर्व भावनांचा उलगडा तिच्या चेहऱ्यावर पसरलेल्या विविधरंगी भावछटांमधून झाला.. दोघांची नजरा नजर झाली आणि योगिनी खूप मनापासून हसली..

योगिनीने प्रशांतला हॉलमधे बसण्यास सांगितले.. तेवढ्यात हॉल मध्ये तिची आई आली.. "अरे प्रशांत.. तू आहेस होय.. मी हिला कधीपासून विचारतेय पण ही कुठे हरवली आहे देव जाणे.. बस बस मी चहा ठेवते.. " असे बोलून तिची आई किचनमधे गेली..

चहा.. थोड्या गप्पा झाल्यावर प्रशांतने योगिनीला बाहेर नेण्याची परवानगी मागितली.. योगिनीच्या घरी सर्व माहीत असल्याने तिच्या आईनेही

त्यांना परवानगी दिली.. त्यांनी योगिनीला जास्त उशीर करू नको असे बजावून सांगितले..

प्रशांतने योगिनीसाठी कॅन्डल लाईट डिनरचा प्लॅन केला होता.. तो हे सर्व गेल्या आठवड्याभरापासून प्लॅन करत होता.. हॉटेलचे पर्याय निवडले.. बऱ्याच हॉटेल्सना त्याने भेटी दिल्या आणि बजेट व अँबियन्स यांचा मेळ साधत या हॉटेलमधे टेबल बुक केले..

दोघे हॉटेलच्या एंट्रन्स जवळ आले प्रशांतने वेटरला बुकिंगचे डिटेल्स सांगितले.. आणि वेटर त्या दोघांना बुक केलेल्या टेबल जवळ घेऊन गेला..

हॉटेलमधे तिचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले.. योगिनी तर एकदम भारावून गेली होती..

प्रशांतने चेयर पुढे ओढून योगिनीला बसण्यास सांगितले.. "या राजकुमारीजी.. आसनस्थ व्हा इथे"

ती लाजत.. मुरडत चेयरवर बसली.. आजूबाजूचे वातावरण खूप छान होते.. चहुबाजुला विशिष्ट हवाहवासा वाटणारा मंद सुगंध दरवळत होता..

दिव्यांचा अंधुकसा लुकलुकणारा प्रकाश.. त्याला साथ करणारे मंद असे रोमँटीक पार्श्वसंगीत..

प्रशांत आणि योगिनीचा टेबल छान सजवला होता.. संपूर्ण टेबलवर गुलाबाच्या पाकळया विखुरलेल्या होत्या.. त्यावर अधेमधे चमकी दिसत होती.. अधेमधे हिरवी पाने दिसत होती.. टेबलच्या मधोमध आकर्षक अश्या हार्ट शेपच्या कॅन्डल स्टॅन्डवर सुगंधित कॅन्डल जळत होती.. समोर भरलेले वाईनचे ग्लास होते..

योगिनी आणि प्रशांतची नजरभेट झाली.. योगिनीचे डोळे पाणावले होते.. तिला हे स्वप्न आहे कि सत्य याचा उलगडा होत नव्हता.. दोघेही काही काळ भारावून गेले होते.. एकमेकांच्या डोळयात खोलवर डुंबत मनाचा ठाव घेण्याचा प्रयत्न करत होते..

# प्रकरण ५

कॅन्डलच्या त्या मिणमिणत्या प्रकाशात प्रशांतने एक वाईनचा ग्लास उचलला आणि योगिनीच्या हातात दिला आणि दुसरा स्वतः उचलला.. योगिनी थोडी थबकली.. ती विचार करत होती कि आज प्रशांतला झालंय तरी काय.. ते दोघेही पीत नव्हते.. आज कसे काय त्याने.. पण तेथील वातावरणाचा.. दोघांच्याही मूडचा भंग होऊ नये.. म्हणून टॉस्ट करत प्रशांत बरोबर तो ग्लास ती एकाच दमात डोळे बंद करून प्यायली..

प्रशांत तिच्या चेहऱ्यावरील हावभाव टिपून खूपच हसत होता.. योगिनी विस्मित होऊन पाहत होती.. ती रुसणार असे प्रशांतच्या लक्षात आल्यावर त्याने वाईनच्या आवरणात लपेटलेल्या कोकम सरबताचे गुपित उघड केले..

हळूहळू योगिनीलाही त्याची चव ओळखीची वाटली.. इतका वेळ त्याला वाईन समजून तिचा त्याबद्दलचा पवित्रा वेगळाच असल्याने तिच्या डोक्यातही आले नव्हते कि ती चव कोकमची होती..

दोघांची नजरा-नजर झाली आणि दोघेही बराच वेळ मनसोक्त हसत होते..

स्टार्टर्स खाऊन झाल्यावर.. प्रशांत जागेवरून उठला आणि योगिनीसमोर गुडघ्यावर बसला आणि एकदम स्टाईलमधे विचारले "मे आय ह्याव द प्लेजर टू डान्स विथ यू.. "

योगिनी भारावून "माय प्लेजर जान" म्हणाली आणि ते दोघेही एकमेकांच्या सहवासात बराच वेळ डान्स करत होते.. . योगिनी मधुन मधुन हसत.. लाजत.. मुरडत होती.. तिला पाहून प्रशांतच्या हृदयाच्या प्रत्येक स्पंदनामधून शब्द बाहेर पडत होते..

“हसता तू जाळ उरी पेटला असा..
काळजाचा ठाव त्याने घेतला पुरा..
वणवा हा मौनरानी सोसाटला खरा..
धग त्याची थोपवाया पाणी पुरणार का.. !”

ते दोघे बराच वेळाने भानावर आले.. आता दोघानांही कडकडून भूक लागली होती..

हॉटेल स्टाफने टेबलवर डिनर व्यवस्थित लावले होते.. प्रशांतने सर्वच पदार्थ योगिनीच्या आवडीप्रमाणे ऑर्डर केले होते.. सर्व पदार्थ आपल्या आवडीचे बघून योगिनी फार खूष झाली..  दोघेही प्रत्येक पदार्थाचा आस्वाद घेत जेवले..

डिनर आटोपून ते दोघे निघाले.. त्याने तिला घरी सोडले.. योगिनी बाईकवरून उतरली.. ती प्रशांतचा निरोप घेऊन.. त्याला अविस्मरणीय अशा संध्येबद्दल थँक यू म्हणून वळली.. तेवढ्यात प्रशांतने तिचा हात हातात पकडला आणि खिशातून तिचे बर्थडे गिफ्ट काढून हातावर ठेवले..

योगिनी फारच खूष झाली.. ती सध्या आकाशात होती..

ती उत्सुकतेपोटी ते गिफ्ट प्रशांत समोरच उघडणार होती.. प्रशांतने तिला अडविले आणि म्हणाला "अ  हा.. घरात जाऊन निवांत बघ आणि आवडले का ते कळव"

ती फुलपाखराप्रमाणे बागडतच घरात शिरली.. रूममधे गेली आणि उत्साहाच्या भरात गिफ्ट उघडले.. अतिशय सुंदर अश्या हार्ट शेपच्या फोटोफ्रेममधे त्या दोघांचा फोटो फ्रेम केलेला होता.. आणि त्याच्या जोडीला एक पत्र होते..

तिने ते अलगद उघडले आणि त्याचा वास घेतला.. सुवास खूपच छान येत होता.. दोन मिनिट डोळे बंद करून ती प्रशांतच्या प्रेमाच्या सुवासिक फुलांचा गंध टिपून घेत होती..

तिने ते पत्र उघडून वाचण्यास सुरुवात केली.. प्रशांतच्या मनातील भावनांनी चिंब भिजलेले असे ते पत्र होते..

“आठवतच नाही आहे भेटलीस तू कुठे अन कधी..
आठवतेय ते एवढेच कि पाहता क्षणी तू
काबीज केलेस माझ्या हृदय आसमंताला..
तुझ्या मन:पटलावरील कांचन सौन्दर्य तू
रेखांकित केलेस माझ्याही नकळत माझ्या मनी..
तुझ्या शिवाय आयुष्याची कल्पनाही करवत नाही..
अन तू जवळी नसता आयुष्य हे आयुष्य उरत नाही..”

ते वाचत वाचतच योगिनीला आजची संपूर्ण संध्याकाळ डोळ्या समोरून गेली..

आजचा दिवस सार्थकी लागल्या सारखे वाटले.. संध्याकाळ पूर्वीचा अस्वस्थपणा जाऊन त्याची जागा हृदयरूपी वेलीला फुटत असलेल्या नव्या पालवीने घेतली होती..

ती सध्या फुलपाखराप्रमाणे स्वप्नरूपी बगीच्यामधे प्रशांतरूपी भ्रमराच्या संगतीत इंद्रधनू रंगी विहार करत होती..

# प्रकरण ६

मजेत चालू होते सगळे.. दोघेही रिलेशनशिपचा.. त्याच्या भोवती फिरणाऱ्या त्यांच्या मोरपिशी आयुष्याचा आनंद घेत जगत होते..

मंगळवार होता.. प्रशांत आणि योगिनी दोघेही नेहमीप्रमाणे लेक्चर्स नंतर लायब्ररी मध्ये अभ्यास करत बसले होते.. दोघांच्याही परीक्षा जवळ आल्या होत्या.. त्याची फायनल इयरची आणि तिची सेकंड इयरची..

प्रशांतला सकाळपासूनच खूप थकवा आणि अशक्तपणा जाणवत होता.. रात्रीची जागरणे.. खाण्या पिण्याच्या वेळा निश्चित नसणे.. त्यामुळे होत असेल असा विचार करून प्रशांत सगळ्या गोष्टींकडे दुर्लक्ष्य करून अभ्यास करण्यात मग्न होता..

बरीचशी पुस्तके चाळत नोट्स काढत बसले होते दोघेही.. प्रशांतला रेफरन्ससाठी अजून एक पुस्तक हवे होते.. तो घेण्यासाठी तो जागेवरून उठत असतानाच भोवळ येऊन जमिनीवर कोसळला.. त्यावेळेस तो तापाने फणफणत होता..

वरवर पाहता साधी तापाची लक्षणे दिसत होती.. म्हणून त्याने एवढे काही लक्ष दिले नव्हते.. नेहमीच आपण करतो तशी.. तापाच्या गोळया घेऊन त्याची स्वयंचकित्सा सुरु होती.. आणि कॉलेज.. योगिनी.. लेक्चर्स.. अभ्यास.. हे त्याचे नित्य पुराण तीन चार दिवस ताप अंगावर काढत चालू होते..

त्याचा परिणाम म्हणजे आता तो लायब्ररीमधे भोवळ येऊन पडला होता.. त्याला लगेचच जवळच्या पुनर्जीवन रुग्णालयात दाखल करण्यात आले..

डॉक्टरांनीं त्याच्या आवश्यक त्या सर्व चाचण्या केल्या.. रिपोर्ट्स उद्या मिळणार होते..

योगिनीने त्याच्या आई बाबांना फोन करून कळविले होते.. ते संध्याकाळ पर्यंत पोहचणार होते..

संध्याकाळी साडे सातच्या दरम्यान त्याचे आई बाबा पुनर्जीवन रुग्णालयात आले.. त्याची आई उफाळून आलेल्या भावनांना आवर घालत नॉर्मल आहे असे दाखवत होती.. बाबाही चिंताग्रस्त दिसत होते..

ते आल्या आल्या योगिनीने सर्व डिटेल्स देऊन रिपोर्ट्स उद्या मिळणार असल्याचे सांगितले.. रात्रभर कोणाचाच डोळयाला डोळा नव्हता.. प्रशांत अजून काही शुद्धीवर आला नव्हता.. मधे थोडासा पाणी पाणी करत आवाज आला होता.. आईने त्याला पाणी पाजले .. अलगद डोळे उघडले होते आणि त्याने आईकडे बघून हसण्याच्या प्रयत्न केला होता.. पण त्यानंतर सकाळपर्यंत तो शुद्धीवर आला नव्हता..

रिपोर्ट्स मिळाले.. प्रशांतला डेंग्यू असल्याचे रिपोर्ट्समधे डिटेक्ट झाले..

डॉक्टरांनी प्रशांतला डेंग्यू रूपी राक्षसाच्या विळख्यातून सोडवण्याचे आटोकाट प्रयत्न केले.. पण त्या राक्षसाने प्रशांतला कडकडून आलिंगन दिले होते.. आणि त्याने शेवटपर्यंत त्याला सोडले नाही..

त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला..

योगिनिच्या प्रेमाच्या आलिंगनातुन सुटून तो मृत्यूच्या बाहुपाशात कायमचा विसावला होता..

# प्रकरण ७

महाविद्यालयीन शिक्षणाच्या फायनल ईयरमधे असलेल्या प्रशांतला योगिनी गमावून बसली.. तिचे विश्वच हरवल्यासारखे वाटत होते..

ती पार सैरभर झाली होती.. तिचे सारे भावविश्वच कोलमडून पडले होते.. जिवंत शरीरामधून कोणीतरी काळीज काढून घ्यावे तसे तिला वाटत होते..

योगिनीला तर महाविद्यालयात पायही ठेवू वाटत नव्हता.. प्रशांतच्या आठवणी तिथे प्रत्येक कानाकोपऱ्यात वास करत होत्या.. कॅन्टीन.. कट्टा.. लायब्ररी.. रस्ता.. सगळेच तिला खायला उठत होते..

ती हल्ली खूप गर्दीच्या ठिकाणी.. घोळक्यामधे थांबण्याचा प्रयत्न करत असे.. तिला एकटेपणा.. शांतता खायला उठत होते..

लायब्ररी देखील तेथील शांततेमुळे तिला भूतबंगल्यासारखी वाटू लागली होती..

तिने स्वतःला सावरण्याचा.. अभ्यास करण्याचा खूप प्रयत्न केला. पण तिचे हृदय तिच्या मेंदूवर भारी पडले.. शेवटी ती सेकंड इयर फेल झाली..

त्याने ती अजूनच खचून गेली.. आपल्याच खोलीत बसून राहू लागली.. कोणाशी बोलणे नाही.. कोणाशी मिसळणे नाही.. सतत एकटक कुठे तरी बघत राहणे.. मधेच भरून येऊन रडणे.. सध्या फार विचित्र मानसिक स्थितीमधे होती ती..  ती हळूहळू डिप्रेशनच्या आहारी चालली होती..

तिच्या आई बाबांना तिला या अवस्थेत पाहून मेल्याहून मेल्या सारखे होत होते.. तिच्या बाबांचे चांगले मित्रच मानसोपचार तज्ञ होते.. त्यांनी तिच्या मानसिक अवस्थेची त्यांना कल्पना देऊन ठेवली होती.. आता गोष्टी खूप हाताबाहेर जायच्या आधीच तिला कॉउंसेलिंगसाठी नेण्याचा विचार तिच्या आई-बाबांनी केला..

जवळ जवळ दहा काउंसेलिंग सेशननंतर योगिनी किंचित नॉर्मल वाटू लागली होती.. तरीही पूर्ण नॉर्मल होण्याकरिता.. प्रशांतच्या आठवणींच्या कप्प्यातून बाहेर यायला तिला वेळ लागत होता..

पुस्तक वाचायला घेतले कि त्यात त्याचा चेहरा.. घास तोंडाजवळ नेताना तो आपल्याला भरवतोय असा भास.. चालत असताना तो आपल्याला मागून आवाज देतोय असा आभास.. ओढणी खिळयात अडकल्यावर त्यानेच पकडली आहे असे समजून.. "गप रे प्रशांत.. अभ्यासाच्या वेळेस मस्करी नको" असे म्हणत मागे वळून पाहताना तो भास असल्याची जाणीव होणे.. सगळेच असह्य होत होते..

स्वतःला कसे बसे सावरून तिने शिक्षण पूर्ण केले ..

# प्रकरण ८

हळूहळू जागा.. आजूबाजूचे जग बदलल्यामुळे ती प्रशांतच्या विरह यातनांमधून बाहेर पडत होती.. पडायचा प्रयत्न करत होती..

पण कधीतरी वीज चमकावी तसे चर्रर्र करून.. काळीज भेदून जायच्या प्रशांतच्या आठवणी.. तिच्या आई - बाबांना हे सर्व कळत होते.. यावर काहीतरी उपाय शोधणे गरजेचे असल्याचे त्यांचे मत झाले..

दरम्यान योगिनी जॉबसाठी इंटरव्हु देत होती.. आठ- दहा तास तरी अडकून राहील आणि शिक्षणही सत्कारणी लागेल असे सांगून.. मागे लागून लागून आई-बाबांनी तिला जॉबसाठी प्रयत्न करण्यास प्रवृत्त केले..

बराच काळ तिच्या मनावर बिंबवल्या नंतर ती आता निरनिराळ्या वेबसाईट्सवर जॉब सर्च करू लागली होती.. तिने आता जॉब पोर्टल्सवर रेझुमे अपलोड करून हळूहळू.. जशी जमेल तशी इंटरव्हुची तयारी सुरु केली होती..

पहिल्या तीन इंटरव्हुजमधे ती सपशेल अपयशी ठरली..

तिने आता स्वतः जवळ आजपर्यंत इंटरव्ह्यूजमधे विचारलेल्या प्रश्नांची क्वेशन बँक तयार करून ठेवली होती..

चौथा इंटरव्हु बरा गेला त्यातल्या त्यात.. पण लास्ट राऊंडला रिजेक्ट झाली..

पाचवा इंटरव्हु तिने मोठ्या हिमतीने क्रॅक केला.. आणि ती जॉबवर रुजू झाली..

हळूहळू जॉबमुळे तिचा प्रशांतच्या आठवणींमधे गुंतण्याचा वेळ कमी होत होता.. पण तरीही अजून ती पूर्णपणे सावरली नव्हती..

जॉबवर रुजू होऊन तिला आता दीड वर्ष झाले होते.. तिने स्वतःला कामात इतके जुंपून घेतले होते कि हळूहळू ती कामात पारंगत होत होती.. दिवसातले चौदा ते सोळा तास ती काम करत होती.. तिचे आई - बाबा काही म्हणाले नाही कारण त्यांना या निमित्ताने तरी ती भूतकाळातून लवकर बाहेर येईल असे वाटले..

योगिनीचे रूटीन हळूहळू सेट झाले होते.. आता ते चांगलेच बसले होते..

इकडे तिच्या नकळत तिच्या आई - बाबांनी तिचे वधू - वर मंडळात नाव नोंदविले..

योगिनीला भनक लागू न देता तिच्या आई -बाबांनी बरीच स्थळे पाहिली.. बरेच ठोकताळे पडताळून पाहून त्यांना शेवटी दोन मुले पसंत पडली..

त्यांनी त्या दोघांनाही आळी पाळीने घरी बोलावले होते

पहिल्या मुलाने योगिनीला पत्रिका जुळत नसल्याचे कारण देत नकार कळवला होता..

दुसरे स्थळ होते अरुण साठे याचे..

अरुणला योगिनी बघताक्षणीच आवडली.. तिच्या आई - बाबांनाही तो पसंत पडला होता.. मुलगा फार मनमिळावू आणि लाघवी वाटत होता..

योगिनी अजूनही कोणताच निर्णय घेण्याच्या मनःस्थितीत नव्हती.. म्हणून तिने कसलाही विचार न करता तुम्ही माझ्यासाठी जो मुलगा शोधाल.. जो निर्णय घ्याल तो  योग्यच असेल असे म्हणुन लग्नाला होकार दिला..

योगिनीला लग्न अतिशय साध्या पद्धतीने करायचे होते.. तिला सध्या गजबजाटापासून दूर राहायचे होते..

तिने तिच्या आई बाबांना आपली इच्छा बोलून दाखवली.. त्यांनी अरुणच्या आई बाबांना आणि अरुणला चालेल का विचारले..  अरुणला आणि त्याच्या घरच्यांना काही प्रॉब्लेम नव्हता..

अरुण योगिनीचा लग्न सोहळा ठरल्याप्रमाणे अतिशय आनंदात पण अतिशय साध्या पद्धतीने पार पडला..

# प्रकरण ९

विश्वास आणि पारदर्शकता हा कुठल्याही नात्याच्या पाया असावा असे योगिनीचे मत होते.. तिला नवीन नात्याची.. त्यांच्या सहजीवनाची सुरुवात सत्य सांगून करायची होती..

लग्नाच्या पहिल्या रात्रीच तिने सर्व हकीकत अरुणकडे वर्णन केली होती.. कॉलेजचे दिवस, प्रशांत.. दोघांचे बॉन्डिंग.. नुकतीच भावी आयुष्याची स्वप्ने रंगवायला सुरुवात झाली असताना त्याचे अचानक तिच्या आयुष्यातून निघून जाणे.. त्याच्या निघून जाण्याने निर्माण झालेली पोकळी.. ती आता हळूहळू भरत जरी आली होती तरी पूर्णपणे अजूनही भरली नव्हती.. आणि ती भरायला आणखी काही काळ तरी लागणार होता..

तिचा त्रास.. त्रागा.. घुसमट.. हळवेपणा याचे कारण आता अरुणच्या लक्षात आले होते..

त्याने तिला सावरायला हवा तेवढा वेळ घे सांगितले.. बऱ्याचश्या गोष्टी तिच्या कलाने घेऊ लागला..

तो योगिनीची खूप काळजी घेत असे.. तिला सतत आनंदी ठेवण्याचा प्रयत्न करत असे.. आपल्या कुठल्याही वर्तणुकीने ती भूतकाळाशी जोडली जाणार नाही याची तो पुरेपूर काळजी घेत असे..

त्याचे काळजी करणे.. न सांगताही बऱ्याचश्या गोष्टी कळत त्याला.. हळूहळू योगिनीलाही त्याचे निस्वार्थ प्रेम, समजूतदारपणा जाणवू लागला होते..

योगिनी हळूहळू आश्वस्थ होत होती.. हळूहळू अरुणच्या संगतीत तिला प्रशांतचा.. त्याच्या आठवणींचा.. त्याच्या भूतकाळातील अस्तित्वाचा विसर पडू लागला होता..

बऱ्याचदा योगिनीला आश्चर्य वाटे कि एवढा पेशन्स येतो कुठून याच्याकडे.. मी तर याच्या जागी स्वतःला इमॅजिनही नाही करू शकत.. मी एवढी धीराने वागू शकले असते.. ?

अरुण योगिनीला कुठे ठेऊ नि कुठे नको करत असे.. त्याचे निस्वार्थ प्रेम योगिनीला त्याची दखल घ्यायला भाग पाडत होते.. हळूहळू योगिनी आता अरुणकडे आकर्षित होत होती..

हळूहळू त्यांचे नाते बहरत होते..

दिवसांमागून दिवस जात होते.. बहर आता पूर्णत्वाला येत होता.. प्रत्येक दिवसागणिक त्यांच्या नात्याच्या आम्र वृक्षावर अधिकाधिक मोहर दिसू लागला.. त्यांच्या खऱ्या नात्याला आता सुरुवात झाली होती..

एकत्र फिरणे.. लॉन्ग ड्राइव्ह.. शॉपिंग.. कॅन्डल लाईट डिनर्स.. औटींग्ज.. मुव्हीज.. नाटके.. त्यांचे सुट्टीचे दिवस सर्व असेच जाऊ लागले..

योगिनी अशीच एका संध्याकाळी अरुणची वाट पाहत हॉलमधे बसली होती.. टीव्हीचे चॅनेल चाळत.. तिचे त्यात अजिबात लक्ष नव्हते.. उगीचच रिमोटच्या बटणांशी खेळत बसली होती.. केव्हाची ती अरुणच्या वाटेकडे डोळे लावून बसली होती.. कधी एकदा अरुण येतो असे झाले होते तिला..

"तुझ्यासाठी सरप्राईज आहे एक" असे तो फोनवर म्हणाला होता.. म्हणूनच फोन झाल्यापासून तो कधी येतो आणि आपल्यासाठी काय सरप्राईज आणतो याचाच विचार करत बसली होती ती..

दारावरची बेल वाजली.. योगिनी पळतच दरवाज्याकडे गेली.. पण तिला अरुणला आपण सरप्राईजसाठी खूपच उत्सुक असल्याचे जाणवू द्यायचे नव्हते.. म्हणून ती दरवाजापाशी जाऊन दोन मिनिट थांबली.. जोरजोरात श्वास घेतले.. एक शेवटचा हूं करून चेहऱ्यावरून आणि केसांवरून हात फिरवून तिने दरवाजा उघडला..

दोघेही एकमेकांकडे पाहून छान हसले.. अरुण आत आला, सोफ्यावर येऊन बसला आणि शूज काढू लागला.. योगिनी पाणी आणण्यासाठी किचनकडे वळली..

# प्रकरण १०

अरुणने तिची पाठ वळलेली पाहिली आणि हळूच बॅगेतून एक इन्व्हलोप काढले आणि पाठीशी डाव्या हातात लपवून धरले..

योगिनी पाण्याचा ग्लास घेऊन आली.. योगिनीला तर अजिबात राहवत नव्हते आता.. अरुण पाणी पीत असताना योगिनी विचार करत होती.. "काय बरे सरप्राईज असेल.. हा बोलत का नाहीय लवकर.. "

ग्लास ठेवण्यासाठी ती वळली तसा अरुणने तिला हाताला धरून ओढले आणि तिचे डॊळे आपल्या उजव्या हाताने अलगद झाकले..

तो तिला विचारू लागला "ओळख बरे काय सरप्राईज असेल ते ". योगिनीला काही अंदाज बांधता येत नव्हता.. "नाही रे मला काही लिंक लागत नाहीय "

त्याने आता तिच्या हातात इन्व्हलोप ठेवले.. "आता ओळख".. योगिनीने ते इन्व्हलोप चाचपडून पहिले.. "कसल्यातरी इव्हेंटचे पास?" अरुण म्हणाला "अ.. ह.." तिला शेवटपर्यंत ओळखता आले नाही..

त्याने तिच्या डोळ्यावरचा हात काढला.. तिने पाहिले तर मलेशियाचे हनिमून पॅकेज होते.. तिचा आनंद गगनात मावत नव्हता.. तिने अरुणकडे पहिले आणि त्याला घट्ट मिठी मारली..

आता बरीच कामे होती.. पुढच्या वीकएंडला ते दोघे मलेशियासाठी निघणार होते..

शॉपिंग आणि इतरही बरीच कामे होती..

अरुणचा वाढदिवस होता पुढच्या आठवड्यात.. योगिनीला आता प्लॅन करायचे होते सर्व.. काय  करावे नक्की या विचाराचे वारे तिच्या डोक्यात वाहू लागले.. तेव्हा ते मलेशियामधे असणार होते.. अरुणसाठी काही तरी खास करायचे होते जेणेकरून तो दिवस त्याच्यासाठी आणि ओघाने तिच्यासाठीही अविस्मरणीय ठरेल..

एकंदरीतच ती खूप खूष आणि एक्सायटेड होती..

अरुण योगिनी मलेशियामध्ये लॅन्ड झाले आणि तेथील सौन्दर्य पाहून भान हरपून गेले.. "स्वर्ग म्हणतात तो यापेक्षा वेगळा तो काय असणार".. असा विचार दोघांच्याही मनात आल्यावाचून राहिला नाही..

आज ते आराम करणार होते.. उद्या मलेशिया वारी होती.. दोन -तीन दिवस मलेशिया फिरणार होते..

मनसोक्त मलेशिया वारी झाली होती त्यांची..  क्काला लंपूर, कॅमेरॉन हायलँड्स , मेलका, कोटा किनबळू, पेनंग बेट.. इतरही छोटी मोठी ठिकाणे पाहून झाली होती.. त्या दोघांनी बरेच फोटोज काढले.. आयुष्याच्या वाटेवर कधीतरी उजळणी करण्यासाठी त्यांनी मलेशियाच्या आठवणींना आपल्याजवळ फोटो स्वरूपात कैद केले होते..

अरूणचा वाढदिवस दोन दिवसांवर येऊन ठेपला होता.. योगिनीला सगळे प्लॅन करायचे होते.. काय आणि कसे करायचे..

आज मात्र तिला खूप थकवा जाणवत होता.. फिरून फिरून एक्झास्ट झाले होते दोघे.. कधी डोळा लागला त्यांचे त्यांनाच कळले नाही..

मलेशियामध्ये हॉटेलच्या स्टाफ बरोबर मिळून तिने वाढदिवस साजरा करण्याची जय्यत तयारी केली होती.. तिने कॅन्डल लाईट डिनर प्लॅन केले होते.. त्या आधी ती त्याला नावेतून समुद्राच्या मध्यभागी नेऊन सरप्राईज देणार होती..

अरुणला या सगळ्याची पुसटशी कल्पनाही नव्हती..

# प्रकरण ११

योगिनी आदल्या रात्री थकल्याचा बहाणा करून झोपी गेली..

बरोबर मध्यरात्री बारा वाजता तिच्या फोनमधील अलार्म वाजला.. तिने फोन मुद्दाम अरुणच्या जवळ ठेवला होता.. अरुण अलार्मच्या आवाजाने जागा झाला.. डोळे चोळत चोळत उठला.. इकडे तिकडे पाहू लागला.. योगिनी छान तयार होऊन बसली होती.. तिने अरुणला खाली नेले.. हॉटेल स्टाफने आधीच तयारी करून ठेवली होती.. खरे तर रात्री १२ वाजता समुद्राच्या मध्यभागी जाऊन केक कट करणे म्हणजे एक प्रकारचे ऍडवेंचरच होते.. पण योगिनीने योग्य ती सुरक्षेची देखील काळजी घ्यायला हॉटेल स्टाफला बजावले होते..

ठरल्याप्रमाणे तिने अरुणला हॉटेलच्या रूम मधून खाली आणले.. अरुणलाही थोडा अंदाज आला होता कि योगिनी काहीतरी सरप्राईज देणार आहे ते. आता तो फ्रेश झाल्यामुळे त्याला परिस्थितीचा अंदाज आला होता.. तो काय सरप्राईज असेल याचा विचार करत होता.. विचारानेही त्याला आतल्या आत गुदगुल्या होत होत्या..

योगिनीने त्याला समुद्र किनाऱ्याजवळ उभ्या असलेल्या बोटीजवळ नेले.. बोटीत चढण्यास सांगितले.. अरुणला कशाचाच मागमूस लागत नव्हता.. त्याचे सर्वच अंदाज सपशेल चुकले होते.. त्यामुळेच जास्ती उकळया फुटत होत्या त्याला..

समुद्राच्या मध्यभागी जाऊन तिने बोट उभी करण्यास सांगितली.. बोटीचा आवाज बंद झाला.. आणि सामसूम पसरली..  ते वातावरणच इतके मंत्रमुग्ध करणारे होते की दोघांनाही काही बोलू वाटत नव्हते..

आकाशात पौर्णिमेचा चंद्र.. चांदण्यांनी जमिनीवर अंथरलेले आकाश.. बागडणाऱ्या लाटांचा खळखळाट.. दोघेही बराच वेळ निःशब्द उभे होते.. एकमेकांच्या डोळयातील भावविश्व टिपत..

अचानक डोळयांवर आलेल्या सर्च लाईटने दोघांची तंद्री तुटली..

योगिनीने केकवर कॅन्डल लावून सूरी अरुणच्या हातात दिली..  त्याने केक कट केला.. योगिनीने त्याला भरवला.. थोडासा खाऊन बाकी त्याने तिला भरवला..

तिने त्याचे गीफ्ट त्याच्या हातात दिले.. सुंदर असे वॉच होते.. त्यासोबतच तिने प्रशांतने तिच्यासाठी लिहलेली कविता अरुणला अर्पण केली.. वाचून दाखवली..

अर्थात तिने त्यात प्रसंगाला साजेसे बदलही केले होते..

“आठवतच नाही आहे भेटलास तू कुठे अन कधी..

आठवतेय ते एवढेच कि क्षणा क्षणांनी मी झाले तुझी..

काबीज केलेस माझ्या हृदय आसमंताला..

तुझ्या मन:पटलावरील कांचन सौन्दर्य तू

रेखांकित केलेस माझ्याही नकळत माझ्या मनी..

तुझ्या शिवाय आयुष्याची आता कल्पनाही करवत नाही..

अन तू जवळी नसता आयुष्य हे आयुष्य उरत नाही..”

अरुण पूर्णपणे भारावून गेला होता.. त्याला काय बोलावे.. काय करावे काही सुचेनासे झाले.. त्याने फक्त तिला आपल्या बाहुपाशात कैद केले कधीही न सोडण्यासाठी..

अरुणला सरप्राईज खूपच आवडले.. त्याला त्याच्या कल्पने पलीकडचे सरप्राईज मिळाले होते.. त्याचा मलेशियातला हा वाढदिवस योगीनेने अविस्मरणीय बनविला होता..

जलपरीला बाहुपाशात घेऊन आपण जलविहार करत असल्याचा भास त्याला होत होता..

# प्रकरण १२

अरुण योगिनी मलेशियावरून परत येऊन अवघे पंधराच दिवस झाले होते.. दोघेही आपापल्या ऑफिसवर रुजू झाले.. त्यांचे नॉर्मल रुटीन परत सुरु झाले..

त्यांचे नाते बहरायला.. फुलायला सुरुवातच झाली होती कि योगिनीला ऑनसाईट जाण्याची संधी मिळत होती..

खूप कन्व्हिन्स केल्यानंतर ती अरुणला सोडून अमेरिकेत आली होती आणि आज अरुणही तिथे होता..

गाडी थांबली तरीही योगिनीचा डोळा लागलेलाच होता..

अरुण तिच्या निरागस चेहऱ्याकडे निरखून पाहत होता.. त्याने तिच्या कपाळावर अलगद ओठ टेकवले तशी ती जागी झाली..

अपार्टमेन्टमधे पोहोचले.. फ्रेश होऊन खाऊन पिऊन दोघेही झोपी गेले..

अरुण शुक्रवारी अमेरिकेत लॅन्ड झाला होता.. त्यामुळे त्या दोघांनाही फिरण्यासाठी पूर्ण वीकएंड मिळणार होता..

अमेरिकेत राहायचे म्हणजे दोन गोष्टी गाठीशी हव्याच.. स्वतःची कार आणि क्रेडिट कार्ड.. योगिनीने अरुण आल्यावर दोघे मिळून कार घेऊ असे ठरवले होते.. तो येईपर्यंतच्या सहा महिन्यांच्या काळात ती पेड टॅक्सी सर्व्हिस वापरत होती..

आता अरुणला अमेरिकेत येऊन पंधरा दिवस झाले होते.. त्याचे हरवलेले सामान त्याला विमानतळ व्यवस्थापनाकडून परत मिळाले होते.. सामान मिळाल्या मिळाल्या अरुणने आधी योगिनीला तिच्यासाठी आणलेली गिफ्ट्स दिली..

अतिशय सुंदर ब्लॅक कलरचा वन पीस होता.. त्याने पाहताक्षणीच योगिनी त्यात कशी दिसेल हे इमॅजिन केले होते.. आणि लगेचच तो तिच्यासाठी पसंत केला होता.. योगिनी तो वन पीस पाहून खूपच खूष झाली.. अरुणने तिला तो घालून दाखव म्हणून आग्रह केला.. ती तो घालून अरुण समोर आली तेव्हा अरुण पाहतच राहिला होता.. त्याने इमॅजिन केले होते त्याहीपेक्षा अधिक सुंदर आणि मोहक दिसत होती योगिनी.. तो आवाक होऊन पाहतच राहिला होता.. योगिनीने त्याला हळूच चिमटा काढला तसा तो भानावर आला..

आज सुट्टीच्या दिवशी तोच घालून ती अरुण बरोबर बाहेर पडली होती.. दोघेही दिवसभर कार बघणार होते आणि आवडली तर बुक करणार होते..

दिवसभर वणवण करून.. त्या दोघांनी बऱ्याच दुकानांना भेटी दिल्या.. बऱ्याच टेस्ट ड्राईव्ह घेतल्या..

फायनली त्यांनी ब्लॅक कलरची होन्डा सिव्हिक पसंत केली आणि बुक केली..

आता प्रश्न होता ड्रायव्हिंग लायसेन्सचा.. इथे वाहन परवाना मिळवण्याकरिता फारच कडक टेस्ट असतात.. प्रथम लेखी परीक्षा असते ती उत्तीर्ण झाले तरच मग ड्रायव्हिंग परीक्षा देता येते.. आणि या औपचारिकतेसाठी साधारण पंधरा दिवस ते एक महिना लागतो..

अरुण आणि योगिनीने या सर्व औपचारिकता वीस दिवसांत पूर्ण केल्या.. आता त्यांच्याकडे वाहन चालवण्याचा परवानाही होता आणि हळूहळू त्या दोघांना उलट्या बाजूला असलेल्या स्टीयरिंगची आणि रस्त्याच्या उलट्या बाजूने गाडी चालवण्याची सवय होऊ लागली होती..

त्यानंतरच्या काळात मात्र दोघांनाही त्यांच्या ब्लॅक होंडा सिवीकची सवय झाली.. दर वीकएंडला तिला घेऊन ते दोघे अमेरिकेतील वेगवेगळया प्रेक्षणीय स्थळांची वारी करू लागले..

त्यांचा असाच दिनक्रम चालू होता.. पाच दिवस जुंपून काम करायचे आणि दोन दिवस मनसोक्त एन्जॉय करायचे.. आजूबाजूच्या प्रेक्षणीय स्थळांना भेटी द्यायच्या..

सर्व कसे मजेत सुरु होते.. हळूहळू अमिरिकेचे राहणीमान.. तिथले लोक.. तिथले नावीन्यही त्यांच्या अंगवळणी पडू लागले होते..

# प्रकरण १३

आजही असाच एक रविवार होता.. योगिनी आणि अरुण त्यांच्या ब्लॅक ब्युटीमधून बाहेर पडले होते..

योगिनीचे सकाळपासूनच थोडे पोट दुखत होते.. आणि आता गाडीत बसल्यावर.. अर्धा रस्त्यात आल्यावर तिला मळमळायला सुरुवात झाली.. पण तिने अरुणला काही जाणवू दिले नाही.. फक्त ती सीट बेल्ट लावण्यासाठी टाळाटाळ करत होती.. अरुण तिला समजावत होता पण ती काही ऐकत नव्हती.. अरुणचे ड्रायव्हिंगवर.. समोर रस्त्यावर कमी आणि योगिनीकडे जास्त लक्ष होते.. तिच्या विचित्र हालचाली पाहून अरुणच्या एवढे नक्की लक्षात आले होते कि योगिनीचे काहीतरी बिनसले आहे.. "योगिनी काय होते आहे नक्की तुला.. सांगशील का आता.. चल घरी परत जाउया आपण.. नंतर कधीतरी जाऊ बाहेर" अरुण

हे सगळे संभाषण चालू असताना अरुणचे ड्रायव्हिंगकडे दुर्लक्ष झाले.. त्याला योगिनीची अवस्था बघवत नव्हती.. फारच अस्वस्थ वाटत होती ती.. योगिनीकडे पाहत होता.. तिची शुद्ध हरपते आहे असे अरुणला जाणवू लागले..

काय करावे अरुणला काही सुचत नव्हते..  योगिनीला नक्की काय होते आहे कळायला मार्ग नव्हता.. तिला डॉक्टरकडे नेणे गरजेचे आहे एवढे मात्र त्याला जाणवत होते.. त्याला डावीकडे हॉस्पिटल असल्याचा दिशादर्शक बोर्ड दिसला..

त्याने तो बोर्ड दिसताक्षणीच काहीही विचार न करता अचानक डावीकडे गाडी वळवली.. क्रॉस रोड होता.. अरुणचे अजिबात लक्ष नव्हते ड्रायव्हिंगवर.. तो देखील कमालीचा अस्वस्थ झाला होता.. डावीकडे वळताना समोरून भरधाव येणाऱ्या ट्रकची धडक बसली.. अरुणचे लक्ष विचलित झाल्याने ट्रक त्याला दिसला नाही.. अरुणचा गाडीवरचा ताबा सुटला..

क्षणात अरुणच्या डोळयासमोर अंधारी आली.. पुढचे सगळे प्रत्यक्षदर्शींनी पाहिले..

गाडी अर्धवटरित्या ट्रकच्या खाली गेली होती..  ॲक्सिडेन्ट इतका भयंकर होता की गाडीच्या बोनेटचा चेंदामेंदा झाला होता.. गाडीची पुढची काच फुटली होती.. रस्त्यावर सर्व काचांचा सडा पडला होता.. बरेचसे काचांचे तुकडे अरुण योगिनीच्या शरीरात घुसले होते.. ट्रकचेही बरेच नुकसान झाले होते..

अरुण आणि योगिनी रक्ताच्या थारोळयात पडले होते.. अरुणने सीटबेल्ट बांधल्यामुळे त्याचे डोके फक्त स्टीयरिंगवर आपटले होते.. योगिनीने सीटबेल्ट न लावल्यामुळे ती समोरच्या काचेतून बाहेर उडून ट्रक आणि कारच्या मधे विचीत्ररित्या अडकली होती.. ती आणि अरुण दोघेही बेशुद्धच होते. रक्तरंगाने जमीन.. गाडी.. स्टीयरिंग.. सीट्स.. रंगून गेले होते..

दोघांचीही शुद्ध हरपली होती असे प्रथमदर्शनी वाटत असले तरी योगिनी विचित्र पद्धतीने अडकली असल्या कारणाने ती बेशुद्ध आहे कि अजून काही हे सांगणे कठीण दिसत होते..

आजूबाजूला लोक जमा झाले.. त्यांनी पोलीस आणि ऍम्बुलन्सला फोन करून झालेल्या प्रकाराची माहिती कळवली..

पोलीस आणि ऍम्ब्युलन्स अवघ्या पाच ते सात मिनिटांत घटनास्थळी पोहोचले.. तेथील लोक म्हणजे नुसती बघ्यांनी ध्वनिचित्रफीत काढण्यासाठी केलेली गर्दी नव्हती.. तर त्यांनी पोलिसांना बरीच मदत केली.. त्यांनी केलेल्या फोनमुळेच पोलीस एवढ्या कमी अवधीत घटनास्थळी पोहोचू शकले होते..

घटनास्थळावरील औपचारिकता पूर्ण करून अरुण आणि योगिनीला तातडीने जवळील लाईफ केयर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले..

चार ते पाच डॉक्टरांची टीम त्यांना अटेंड करत होती.. त्यात एका भारतीय डॉक्टरचाही समावेश होता.. तो परदेशात एम डी करून नोकरीनिमित्त गेल्या ५ वर्षांपासून अमेरिकेत स्थायिक झाला होता.. त्याचे नाव तुषार कुलकर्णी.. अतिशय हुशार आणि हार्ड वर्किंग होता तो..

अरुणचा सीटबेल्ट असल्यामुळे त्याला कमी लागले होते.. खूप साऱ्या जखमा.. आणि डावा हात फ्रॅक्चर झाला होता.. डोके आपटल्यामुळे डोक्याला मार लागला होता.. पण योगिनीला जबर मार लागला होता.. तिला तातडीने ऑपेरेशन थिएटर मध्ये हलवण्यात आले..

मेंदूला जबर मार लागला होता.. तिला पाहून अकॅसिडेन्टच्या भीषणतेची कल्पना येत होती..

तिच्यावर चार तास शस्त्रक्रिया चालू होती..

योगिनीला शस्त्रक्रियेनंतर आयसीयु मध्ये हालवण्यात आले.. पुढचे चोवीस तास योगिनीसाठी फारच क्रिटिकल होते.. तिला किमान चोवीस तास तरी अंडर ओब्जेर्वशन ठेवायचे होते.. त्यानंतरच डॉक्टर तिच्याविषयी.. तिच्या तब्बेतीविषयी काही टिप्पणी करू शकणार होते..

अरुणलाही बेडरेस्ट सांगितली होती.. त्यामुळे तो शुद्धीत असूनही योगिनी जवळ जाऊ शकत नव्हता.. डॉक्टर आणि नर्सच्या टीमने या कठीण काळात योगिनीची काळजी घेतली..

अरुण अजूनही ऍक्सिडेन्टच्या धक्क्यातून पुरता सावरला नव्हता.. डॉक्टरांना प्रश्न पडला होता कि अरुणला अजून एक वाईट बातमी कशी सांगावी.. जी अरुणच्या कानावर घालणे त्यांचे कर्तव्य होते.. पण ते कधी आणि कसे सांगायचे हा मोठा प्रश्न होता..

# प्रकरण १४

आता चोवीस तास उलटून गेले होते.. योगिनीला पाहण्यासाठी डॉक्टर आयसीयु मध्ये आले.. योगिनी अजूनही शुद्धीत आली नव्हती.. डॉक्टरांनी हार्टरेट.. पल्स चेक केले.. बाकीचे गेल्या चोवीस तासातील रिडीन्गज नर्सनी पेशंट चार्टवर नमूद केले होते.. त्यावरून डॉक्टरांनी नजर फिरवली.. काहीशी चिंता त्यांच्या चेहऱ्यावर उमटली.. योगिनीकडून हवा तसा प्रतिसाद मिळत नव्हता..

पुढच्या दोन तासांत डॉक्टरांची भीती खरी ठरली.. योगिनी कोमात गेली..

आता अरुणला सत्य सांगण्याची वेळ आली आहे असे डॉक्टरांना वाटले.. डॉक्टरांनी त्याला सत्य परिस्थितीची जाणीव करून दिली.. तसेच अजून एक धक्कादायक बातमीही त्याला सांगण्यात आली.. "मिस्टर अरुण.. एक वाईट बातमी आहे.. आम्ही पुरेपूर काळजी घेऊन.. योग्य निगराणी करूनही मिस योगिनी कोमात गेल्या आहेत.." अरुणला आपल्या कानांवर विश्वास बसत नव्हता.. "अजून एक वाईट बातमी आहे मिस्टर अरुण.." अरुण फक्त ओघळत्या डोळयांनी डॉक्टरांकडे पाहत होता.. तो विचार करत होता कि यापेक्षा अजून काय वाईट बातमी असू

शकते.. "अत्यंत दुःखपूर्वक आम्हाला सांगावे लागतेय कि मिस योगिनी दोन महिन्यांच्या प्रेग्नेंट होत्या आणि आता ते बाळ या जगात नाही.. त्याचाही अक्सिडेन्टमधे दुर्दैवी अंत झाला आहे.. ”

हे सर्व ऐकून अरुणचे डोके सुन्न झाले.. त्याला त्याच्या पायाखालची जमीन सरकल्यासारखे वाटत होते.. तो स्वतःही अजून फार बरा झालेला नव्हता आणि त्यात संकटांवर संकटे येत होती.. तो बेडवरुन उठण्याचा प्रयत्न करत होता.. पण फ्रॅकचर.. मुक्का मार.. डोक्यावरील जखमा यामुळे त्याला फारशी हालचाल करता आली नाही..

ते सगळेच असह्य होऊन तो लहान मुलासारखे ओकसाबोक्शी रडायला लागला.. त्याला आवरणे फार कठीण गेले डॉक्टरांना.. त्याला झोपेचे इंजेकशन देण्यात आले.. त्यानंतर तो हळूहळू निद्रेच्या स्वाधीन झाला.. पण अरुणच्या मनातील असह्य वेदनेचे अश्रू अजूनही त्याच्या डोळयांवाटे बाहेर पडत होते..

अरुणचे फ्रॅकचर्स आणि जखमा बऱ्या झाल्या होत्या.. पण योगिनी अजूनही त्याच अवस्थेत होती.. तिची हालत बघून त्याला प्रचंड त्रास होत होता.. त्याला परिस्थितीसमोर हतबल झाल्यासारखे वाटत होते..

योगिनी दोन महिने कोमात होती.. अरुणची तर त्या काळातील स्थिती बघवत नव्हती.. ना धड झोप.. ना खाणे-पिणे.. फक्त काळजी.. उद्वेग आणि मानसिक त्रास..

देवावर फारसा काही विश्वास नसणारा अरुण आपल्या योगिनीसाठी हॉस्पिटलच्या आत असलेल्या जिजसच्या मूर्तीकडे पाहून योगिनीला बरे करण्याची आणि या काळात हिम्मत न हरण्याची शक्ती मागत होता..

थोडा हिंडू फिरू लागल्यावर तिथे जवळच असलेल्या छोट्याश्या गणपती मंदिरात जाऊन आला..

ती कधी एकदा शुद्धीवर येते असे अरुणला झाले होते.. तिचा आवाज.. तिचे बोलके डोळे.. तिचा स्पर्श.. सगळे सगळेच तो मिस करत होता..

तहान-भूक-झोप हरपून रात्रंदिवस तो तिच्या उश्याशी बसून असायचा..

कधी तिचा हात हातात घेऊन तिच्या आठवणींमध्ये भूतकाळात शिरकाव करायचा तर कधी दोघांनी मिळून पाहिलेल्या भविष्यातील स्वप्नांची उजळणी करायचा..

असाच एके दिवशी तो तिचा हात हातात घेऊन बसला होता..

त्याला आठवले त्याचे आणि योगिनीचे संभाषण.. तिचा फोन लागत नव्हता आणि तो अतिशय कासावीस झाला होता.. तो घरी येऊन अर्धा तास झाला होता.. योगिनी अजून आली नव्हती.. त्याचे पेशन्स संपले आणि तो तिला शोधण्यासाठी बाहेर पडत होता.. दार उघडला तर समोर योगिनी उभी होती.. तिला पाहून त्याने त्याच हैराण मनःस्थितीत तिथेच तिचा समाचार घेण्यास सुरुवात केली..

योगिनीने त्याच्या मनःस्थितीचा अंदाज घेत सगळे ऐकून घेतले.. आणि मग बोलू लागली "झाले तुझे.. मी बोलू का आता जरा.. अरे एवढे काय झाले फोन डिस्चार्ज झाला होता.. केवढा घाबरला आहेस तू.. वेडा कुठला.. मी कायमची सोडून जाईन त्यावेळेस काय करशील.." अरुणने तिच्या तोंडावर आपला हात ठेवला.. त्यावेळी त्याला फक्त कल्पनाही असह्य वाटली होती.. तिला बाहुपाशात जकडून बराच वेळ उभा होता..

अरुणला एकदम विचार करत करत डुलकी लागली.. पण त्याने पाणी मारून.. रूम मध्ये येरझाऱ्या घालून आपली झोप उडवली होती..

तो फक्त योगिनी शुद्धीवर येण्याची वाट पाहत होता..

# प्रकरण १५

आज तब्बल पंधरा दिवसांनी सकाळी सव्वा दहाच्या दरम्यान योगिनी शुद्धीवर आली.. तिने अलगद डोळे उघडले.. इकडे तिकडे पाहिले.. शेजारी बसून डोक्यावर हात फिरवणाऱ्या.. कुरवाळणाऱ्या व्यक्तीकडे.. अरुणकडे ती अनोळखी नजरेने पाहत होती.. तिच्या चेहऱ्यावर खूप विचित्र हावभावांनी गर्दी केली होती.. अरुणला काही कळण्यास मार्ग नव्हता की योगिनीला काय होते आहे..

तोपर्यंत नर्सने डॉक्टरांना बोलावले.. डॉक्टर तुषार तिथे आले.. ते तिची तपासणी करू लागले.. योगिनीचे हावभाव हळूहळू बदलू लागले.. तिच्या चेहऱ्यावर एक आश्वस्थपणा.. आनंद दिसत होता.. "प्र.. श.. त.." असे काहीतरी पुटपुटली.. तिचे डोके जड झाल्यासारखे वाटू लागले.. डॉक्टर तुषारनी तिला इंजेक्शन दिले आणि ती शांत झोपी गेली..

अथक प्रयत्नांनीं तिला वाचवण्यात डॉक्टरांना यश आले होते.. अरुणला एवढ्या दिवसांनी योगिनीचा आवाज ऐकून खूपच आनंद झाला होता.. पुसटसा आवाजच आला होता तिच्या तोंडून.. पण अरुणला तोहि ऐकून खूप बरे वाटले..

पण दुसरीकडे तो विचारही करत होता कि काय झालंय माझ्या योगिनीला.. आपल्याकडे पाहून अशी का रिऍकशन दिली.. ती शुद्धीवर आली तेव्हा काय पुटपुटत होती.. काही ताळमेळ लागत नव्हता.. नुसता गोंधळ सुरु होता त्याच्या मनात..

दुसऱ्यादिवशी सकाळी ती शुद्धीवर आली आणि कालपेक्षा बरी वाटत होती.. पण तिचे डोळे खोलीभर भिरभिरत होते कोणाला तरी शोधत असल्यासारखे.. तेवढ्यात अरुण खोलीत शिरला.. योगिनीने त्याला पाहून परत कालच्याच रिऍकशनची उजळणी केली.. ती मनात विचार करत होती.. "हा कोण आहे आणि कालपासून माझ्या आजूबाजूला का वावरतोय सतत.. आणि प्रशांत कुठे आहे"

अरुणला आजही काही कळण्यास मार्ग नव्हता.. तो योगिनीच्या चेहऱ्यावरील हावभाव वाचण्याचा प्रयत्न करत होता..

डॉक्टर तुषार रेग्युलर तपासणीसाठी रूममधे आले.. " काय मॅडम कसे वाटते आहे आता.." त्यांना पाहताच योगिनीचा चेहरा एकदम आश्वस्थ आणि प्रफुल्लीत झाला.. ती बोलू लागली "अरे कुठे होतास तू .. आणि हा काय प्रकार आहे.. आपण कुठे आहोत आणि मी इथे कशी.. ?"

डॉक्टर तुषार तपासणी आणि नमूद केलेल्या नोंदी पाहण्यात व्यस्त होते.. योगिनी परत बोलू लागली "अरे असा काय करतो आहेस.. मी तुझ्याशी बोलते आहे.. "

# प्रकरण १६

अरुण आणि डॉक्टर तुषार एकमेकांकडे बघतच राहिले.. दोघांनाही कसलाच थांग पत्ता लागत नव्हता कि योगिनीला काय झाले आहे..

"अरे प्रशांत असे काय करतो आहेस.. तुझ्याशी बोलते आहे मी.." योगिनी

तरीही डॉक्टर तुषारना कळत नव्हते कि प्रशांत कोण आहे.. इतके दिवसांत डॉक्टरांना अरुणचे नाव माहीत झाले होते.. पण हा प्रशांत कोण कळत नव्हते..

अरुणच्या डोक्यात मात्र आता प्रकाश पडू लागला.. त्याच्या लक्षात येत होते कि हा काय प्रकार सुरु आहे..

तुषार आणि प्रशांतच्या चेहऱ्यात कमालीचे साम्य होते.. योगिनी त्यामुळे त्यालाच प्रशांत समजत होती..  योगिनीच्या बोलण्याचा अर्थ लावत असताना डॉक्टर तुषारच्या चेहऱ्यातील साम्य अरुणच्या लक्षात आले होते..

"डॉक्टर एक मिनिट.. एक्सक्युज मी प्लिज" असे म्हणून अरुण.. डॉक्टर तुषारना रूमच्या बाहेर घेऊन गेला..

अरुणने त्यांना सांगितले कि योगिनी तुम्हाला प्रशांत समजत आहे.. पण का ते समजत  नाहीय डॉक्टर..

डॉक्टर तुषारना वेगळाच संशय येत होता.. कदाचित योगिनीची स्मरणशक्ती गेली असण्याची शक्यता नाकारता येत नव्हती..

पण अरुणला काही सांगण्यापूर्वी त्यांना खात्री करून घ्यायची होती.. त्यांनी अरुणला तिच्या आई बाबांचा फोटो वर काढण्यास सांगितले.. अरुणने आपल्या फोनमधुन तिच्या आई बाबांचा फोटो शोधून.. उघडून ठेवला..

ते दोघे आत रूममधे गेले.. डॉक्टर तुषारनी तिला तो फोटो दाखवत विचारले की “यांना ओळखतेस का?”

“अरे प्रशांत माझ्या आई बाबांना मी नाही ओळखणार का?  काय चाललंय काय तुझे..?”

डॉक्टरांना वाटले माझा अंदाज चुकत आहे कि काय ?

त्यांनी परत तिला अरुणकडे पाहून याला ओळखले का म्हणून विचारले..? पण तिच्या चेहऱ्यावरची कोणतीच रेष ओळख पटल्याची ग्वाही देत नव्हती..

“आपण कुठे आहोत.. काय चालू आहे.. प्रशांत सोडला तर इथे सगळे अनोळखी लोकच कशे नजरेस पडत आहेत ..” योगिनीच्या विचारांचे घोडे असे चौफेर उधळत होते..

ती थोडा डोक्यावर जोर द्यायचा प्रयत्न करू लागली.. तशी तिला भोवळ येऊ लागली.. डॉक्टरने तिला इंजेकशन दिले.. ती परत झोपेच्या स्वाधीन झाली..

आता त्यांना खात्री पटल्यावर डॉक्टरांनी त्यांना वाटणारी शंका अरुणला बोलून दाखविली.. योगिनीची स्मरणशक्ती गेली होती.. अरुणसहित नजीकच्या भूतकाळातील आणि चालू वर्तमानकाळातील काळातील गोष्टी तिच्या स्मरणशक्तीतून पुसल्या गेल्या होत्या.. ती मानसिक दृष्ट्या अजूनही प्रशांतबरोबर तिच्या महाविद्यालयीन काळातच वावरत होती..

अरुणच्या पायाखालची जमीन सरकली..

“काय हा दैवदुर्विलास.. माझ्याच बाबतीत असे का घडतेय आणि तेही अश्या परक्या ठिकाणी.. जिथे ना जीव लावणारी माणसे आहेत ना मनाच्या भरतीला थोपवणारी.. “

गोष्टी एवढ्या वेगाने घडल्या होत्या कि त्याने अद्यापही दोघांच्याही घरी कळवले नव्हते.. आता मात्र त्याला त्याच्या आई बाबांची प्रचंड आठवण येत होती.. मानसिक आधार देणारे तिथे कोणीच नव्हते..

त्याने फोन करून तिच्या आणि त्याच्या आई बाबांना सांगितले..

ते चौघे मिळेल त्या पुढच्या विमानाने तडक अमेरिकेला निघणार होते.. पण अरुणने त्यांना गडबड करण्याची गरज नसल्याचे सांगितले.. काही लागले तर कळवतो असे सांगून फोन ठेवला..

त्याला आता त्याच्या आई वडिलांशी बोलून फार बरे वाटत होते.. त्यांच्या शब्दांनी त्याला थोडी उभारी मिळाली होती..

तो पुढच्या इंनिंगसाठी तयार होत होता..

# प्रकरण १७

हळूहळू योगिनी प्रशांत समजून डॉक्टर तुषार घेत असलेल्या काळजीने.. अरुणच्या डॉक्टर तुषारना असलेल्या अदृश्य आधारामुळे अपघातातून.. अपघाताच्या धक्क्यातून सावरत होती..

ती आता शारीरिक दृष्ट्या पूर्ण बरी झाली होती.. पण मानसिक दृष्ट्या अजूनही महाविद्यालयीन काळातच वावरत होती..

डॉक्टरांनी इतक्यातच तिच्या मेंदूवर ताण पडेल अशी कोणतीही गोष्ट करण्यास मनाई केली होती.. ती या अपघातामुळे काळाच्या मागे पडली होती.. आता काळच तिला त्याच्या सोबत परत समांतर रेषेत आणू शकणार होता..

अरुण आता आपले भविष्य काळाच्या हवाली करून अरुण योगिनीला बरा होण्याकरिता वेळ देणे आणि डॉक्टर तुषारना मदत करणे हेच करू शकत होता

अरुणने योगिनीला दवाखान्यातून डिस्चार्ज मिळण्याच्या आदल्या दिवशीच अपार्टमेन्टमधील गोष्टींची आवारावर करून ठेवली होती.. त्या दोघांचे लग्नाचे आणि इतर निरनिराळ्या आठवणी गुंफलेले फोटो.. भिंतीवरून काढून

स्वतःच्या बॅगेत ठेवून दिले होते जेणेकरून योगिनी हॉस्पिटलमधून आल्यावर तिला भूतकाळाचा मागमूसही लागू नये..

सप्तपदीच्या पाऊलखुणा मिटवताना होणारा त्रास फक्त अरुणलाच कळत होता.. काळापुढे पुरता हतबल झाला होता..

काळाची गरज ओळखून डॉक्टर तुषार अरुण-योगिनी सोबत त्यांच्या अपार्टमेन्टमधे प्रशांत बनून राहायला आले..

अरुणला पाहून योगिनी डॉक्टर तुषारना म्हणाली "हे पण आपल्या सोबत राहणार आहेत का?"

"अरुण माझा मित्र आहे.. तो अमेरिकेत नवीन आहे.. त्याची राहण्याची इतरत्र व्यवस्था होईपर्यंत तो आपल्या सोबतच राहणार आहे.. तुला काही प्रॉब्लेम नाही ना ?"

"अरे मला काय प्रॉब्लेम असणार प्रशांत.. या अनोळखी जगाशी ओळख होईपर्यंत कोणी ओळखीचे मिळाले की बरेच वाटते रे.."

योगिनीच्या त्या शब्दांनी अरुणच्या डोळयात टचकन पाणी आले.. जीवाभावाचे माणूस आता अनोळखी झाले होते..

"पण आपण इकडे कधी आलो.. मला काहीच कसे आठवत नाहीय.." योगिनी मेंदूवर.. स्मरणशक्तीवर जोर द्यायचा प्रयत्न करत होती.. तिचे डोके जड झाले.. आणि तिला भोवळ आली.. ती खाली पडणार तोपर्यंत अरुणने तिला सावरले आणि बेडवर झोपवले..

"प्रशांत जवळच बस असा.. मला सोडून जाऊ नकोस.." असे म्हणत अरुणचा हात हातात घेत योगिनी तशीच झोपून गेली..

योगिनी हळूहळू सावरत होती.. हल्ली हल्ली तिला घरात बसून खूप कंटाळा आला होता..

असाच एक दिवस ती प्रशांतकडे बाहेर नेण्यासाठी हट्ट करू लागली.. शॉपिंग करून येऊ.. मोकळया हवेत फिरले कि बरे वाटेल रे जरा.. फिरल्यासारखेही होईल आणि शॉपिंगही..

डॉक्टर तुषारनी अरुणकडे पाहिले.. अरुणने डोळयांच्या पापण्यांची हालचाल करून मूकसंमती दर्शविली..

योगिनी कितीतरी दिवसांनी हॉस्पिटल आणि घर ही दोन ठिकाणे सोडून बाहेर पडली होती.. तिला खूप दिवसांनी बाहेर फिरायला मिळत होते.. शुद्ध ताजी हवा काय असते याचा बहुधा तिला विसरच पडला होता जणू.. गेले कितीतरी दिवस तिने फक्त हॉस्पिटलचीच हवा.. स्पिरिट अन गोळया औषधांचा वासच अनुभवला होता.. आणि या जगात बहुधा हेच वास शिल्लक असावेत असेच तिला वाटत होते.. मोकळी हवा म्हणजे दैवी देणगी वाटत होती तिला.. या फेरफटक्यामुळे परत तिच्यात प्राण संचारल्यासारखे वाटत होते..

योगिनीने शॉपिंग केले.. डॉक्टर तुषारनी क्रेडिट कार्डने पेमेन्ट केले आणि वॉलेटमध्ये ते ठेवत असताना त्यांच्या हातातून ते निसटून खाली पडले.. तुषार वाकून ते घेणार तोपर्यंत योगिनी वाकली आणि तिने ते कार्ड उचलले.. त्या कार्डवर तुषार कुलकर्णी हे नाव पाहून योगिनीच्या कपाळावर बारीकशी आठ्यांची झालर उमटली..

"माझ्या आतेभावाचे कार्ड आहे.. असे म्हणून तुषारनी वेळ मारून दिली.."

योगिनीने जास्त काही विचार न करताच त्या गोष्टीचा नाद तिथेच सोडून दिला..

योगिनी.. तुषार उर्फ प्रशांत आणि अरुण यांच्या त्रिकोणमितीतच तीन महिने निघून गेले..

अरुण मात्र या काळात आतल्या आत आपल्या वेदना लपवत जगत होता.. सीतेसोबत असूनही रामाला सीता हरणाचे.. तिच्या ताटा तुटीचे.. विरहाचे दुःख भोगावे लागत होते..

# प्रकरण १८

योगिनीला हल्ली कसली कसली स्वप्ने पडू लागली होती.. डोळयासमोर वेगवेगळया व्यक्ती.. चित्रे.. फोटो.. असे सारे अस्पष्ट दिसत होते.. लग्न.. सप्तपदी.. या सगळया विधी डोळयासमोरून जात होत्या अस्पष्ट रूपात.. तिला या सगळयांत प्रशांत कुठेच दिसत नव्हता.. ती बऱ्याचदा झोपेतून उठून बसायची.. दरदरून घाम फुटलेला असायचा तिला..

अरुणला तिला असे पाहून त्रास होत असूनही तिला सावरता येत नव्हते.. तिला जवळ घेता येत नव्हते.. डॉक्टर तुषार व्यवस्थित अंतर ठेवून शक्य तितके तिचे सांत्वन करत होते..

ही स्वप्नश्रुंखला जवळ जवळ सहा महिने चालू होती.. सतत त्याच आकृती.. तेच सोहळे.. तेच क्षण एखाद्या चित्रपटाप्रमाणे तिच्या डोळयांसमोरून धावायचे.. बऱ्याचदा ती दचकून.. अस्वस्थपणाला कवटाळूनच झोपेतून जागी व्हायची.. पण सगळेच अस्पष्ट.. अंधुक दिसायचे.. हे वारंवार होत असल्याने ती बऱ्याचदा कोशात जायची..

अनेकदा या अस्वस्थेत सैरभैर झालेली ती अरुणला दिसायची.. पण त्याचे योगिनीला या स्वप्नांचे अर्थ.. तिला विसर पडलेला त्या दोघांचा नजीकचा भूतकाळ सांगण्याचे धाडस कधी झाले नाही.. त्याला कोणत्याही बळजबरीने तिला बरे करायचे नव्हते.. तिने आपणहून स्वतःच निसर्गतः पूर्ववत व्हावे असेच अरुणला वाटत होते..

डॉक्टर तुषार तिच्या नियमित तपासण्या करत असायचे.. त्या एका बाबतीत तो निःश्चिन्त होता..

दिवस.. आठवडे.. महिने आपल्या वेगाने पुढे सरकत होते..

अरुण स्वतःला कामात गुंतवून घेत गोष्टींना विसरण्याचा प्रयत्न करत होता..

एकटाच सगळे व्यवस्थापन बघत होता.. पण आता त्याला त्याच्या आई वडिलांची खूप आठवण येत होती..

ते जर इकडे अमेरिकेत आले तर गोष्टी खूप सोप्या होतील..

आई-बाबा इथे आले तर बऱ्याच गोष्टी सोप्या होतील.. असा विचार करत करतच त्याने आईला फोन लावला.. आणि सध्या असलेली योगिनीची अवस्था आणि एकंदर परिस्थितीबद्दल त्यांना सविस्तर माहिती दिली..

आईने त्यांना भारतात परत येऊन पुढील उपचार इथेच रुजू करण्याचा सल्ला दिला.. अरुणलाही भारतात परत जावे असे वाटत होते..

पण प्रॉब्लेम असा होता की डॉक्टर तुषार शिवाय योगिनी काही या अवस्थेत भारतात परत यायची नाही.. आणि डॉक्टरांना त्यांचे इथले काम सोडून भारतात आपल्या सोबत चला म्हणणे काही अरुणला बरे वाटत नव्हते.. आधीच ते खूप करत होते.. चांगल्या माणसाला एवढे गृहीत धरणे त्याला बरोबर वाटत नव्हते..

अरुण आईलाच म्हणाला "तुम्हाला जमेल का इकडे यायला? मला खूप गरज आहे तुमची.."

“बाबांशी बोलून कळवते.. कारण त्यांना जमेल असे वाट नाहीय.. तरीपण विचारून बघते.. त्यांची व्यवस्था बघावी लागेल.. मी कळवते तुला.. ”

अरुणच्या आईचा एक तासाभराने कॉल येतो.. “हे बघ बाळ, बाबांना तर जमेल असे वाटत नाही..  एवढी सुट्टी नाही मिळणार..“

“अगं मग एकटी कशी येणार एवढ्या दूर तू..“

“एकटी नाही येत तुझ्या सासूबाईंना विचारते.. त्यांचाही जीव लेकीसाठी तुटत असेल रे.. योगिनीलाही बरे वाटेल.. . विचारू ना?”

“अगं आई हे माझ्या डोक्यात कसे नाही आले.. . “

“डोक्यात यायला डोके ठिकाणावर असायला हवे ना.. “

“ए काय ग आई..” म्हणत अरुण बऱ्याच दिवसांनी मनसोक्त हसला.. “

# प्रकरण १९

अरुण खूप खूष होता.. आता त्याला आईच्या अमेरिकेत येण्याचे वेध लागले..

अरुणने त्यांची फ्लाईटची तिकिटे बुक केली.. त्यांना डिटेल्स पाठवून दिल्या..

अरुणची आई आणि त्याच्या सासूबाई म्हणजेच योगिनीची आई या दोघी अमेरिकेत लॅन्ड झाल्या.. अरुण त्यांना घेऊन अपार्टमेन्टकडे आला..

योगिनीने तिच्या आईला ओळखले आणि धावत जाऊन लहान बाळाप्रमाणे तिला बिलगली.. तिने या मागच्या काळात बरेच काही पाहिले होते.. त्याचा क्षीण तिला हल्ली जाणवत होता.. तिला भारतात परतायचे होते.. पण प्रशांतच्या सांगण्यावरून तब्बेतीत थोडी सुधारणा होईपर्यंत इथेच राहावे लागणार होते..

अश्या परिस्थितीत आईचे असे येणे म्हणजे तिच्यासाठी सुखद अनुभव होता..

आई आल्यामुळे योगिनीच्या हालचालींमधे हळूहळू सकारात्मकता येत होती.. अरुण या गोष्टीने मनोमान सुखावला होता..

पण योगिनीची अनोळखी नजर अजूनही त्याला अस्वस्थ करत होती.. योगिनी झोपल्यावर तिची आई, अरुण आणि त्याची आई बोलत बसत..

योगिनीची आई तर अरुणचे आभार मानत होती.. एवढा पेशन्स कुठून आणलास अरुण.. फार धीराचा बाबा.. मी आणि योगिनीच्या बाबांनी देवाचे आभार मानले..

असेच दिवस चालले होते.. अक्सिडेन्टला आता ७ महिने झाले होते.. पण अजूनही योगिनीची स्मृती परत येण्याची काही चिन्हे दिसेना..

सर्व दैवाच्या हवाली करून.. चमत्कार होण्याची वाट पाहात.. माणसाला अविरत "मर्यादा" या शब्दाशी झुंज द्यावी लागते.. एका मर्यादेपलीकडे माणूस हतबल होतो आणि सगळेच निसर्गनिर्मात्याच्या हवाली करतो याची अलीकडच्या काळात अरुणला प्रचिती आली होती

# प्रकरण २०

संध्याकाळची सगळी कामे उरकून अरुणची आई आणि योगिनीची आई अरुण घरी येण्याची वाट पाहत होत्या..

अचानक त्यांच्या कानावर योगिनीची बडबड पडली.. दुपारच्या जेवणानंतर औषधे घेऊन योगिनी झोपली होती.. पण अचानक तिची वळवळ सुरू झाली.. झोपेत काहीतरी पुटपुटत होती.. या दोघी तिला हालवून जागे करण्याचा प्रयत्न करत होत्या.. काय होते आहे याची विचारणा करत होत्या.. पण त्यांच्या हाकेला तिचा काहीच प्रतिसाद नव्हता..

हल्ली बऱ्याचदा ती अशी झोपेत बडबडत असे.. आणि डॉक्टर तुषार बऱ्याचदा ते सांभाळून घ्यायला मदत करत असत..

आज नेमके ते डॉक्टरांच्या कॉन्फरन्सकरिता दुसऱ्या शहरात गेले होते..

आणि आजचे प्रकरण जरा जरूरीपेक्षा जास्त लांबले होते.. अरुणच्या आईने मग अरुणला फोन केला.. पण त्यानेही उचलला नाही.. मग त्यांनी मेसेज करून ठेवला..

योगिनी काही केल्या शांत होत नव्हती.. योगिनीच्या आईने न राहवून शेवटी हाताने तिच्या चेहऱ्यावर शिंपडले.. पण तरीही ती जागी झाली नाही.. नाईलाजाने आता तिच्या आईने तिच्या चेहऱ्यावर तांब्याभर पाण्याचा मारा केला..

तशी ती प्रशांत असे जोरात ओरडत झोपेतून जागी झाली ते ओक्शाबोक्शी रडतच..

तोपर्यंत दाराची बेल वाजली.. अरुण आला होता..

स्वतःच्या आईचा आणि सासूचा घाबरलेला गांगरलेला चेहरा पाहून.. जमिनीवरचे पाणी पाहून इथे काहीतरी अनपेक्षित घडले आहे याचा त्याला अंदाज आला.. पण नक्की काय हे त्याला कळत नव्हते..

तो काही विचारणार तोच त्याच्या आईने त्याला योगिनीकडे पाहण्याचा इशारा केला

तिची ती अस्ताव्यस्त अवस्था पाहून अरुणच्या डोळयात टचकन पाणी आले..  काय झाले आहे हे जरी त्याला सविस्तर माहीत नव्हते तरी तिच्या वेदना.. तिच्या मनाचे मेंदूशी चाललेले युद्ध.. बरी होण्यासाठी तिची धडपड सगळे त्याला कळत होते..

योगिनी प्रशांत प्रशांत करून धाय मोकळून रडत होती.. अरुणला पाहताच ती उठली आणि त्राण नसलेल्या शरीराने उठून त्याच्याकडे जाण्याचा प्रयत्न करू लागली.. दोन पावले चालली नाही की ती तोल जाऊन खाली पडणार तोच अरुणने पुढे होत तिला सावरले.. बेडवर झोपवले..

अरुण इथे नसताना काय काय घडले ते अरुणच्या आईने त्याला सांगितले.. अरुणला या साऱ्याची सवय होती.. पण तरीही तो विचारात पडला कि “आज असे काय झाले किंवा दिसले कि ती प्रशांतच्या नावाने ओरडत उठली.. डॉक्टर तुषार इथे नसल्यामुळे.. तिला आज न दिसल्यामुळे असे झाले असावे का..” अरुण मनातल्या मनात निरनिराळे तर्क लावत होता.. पण खरे काय ते योगिनीच सांगू शकणार होती..

आता ते सारे तिची शुद्धीवर यायची वाट पाहू लागले..

# प्रकरण २१

एक तासानंतर योगिनी शुद्धीवर आली.. तिने उठून इकडे तिकडे खोलीभर नजर फिरवली.. तिला तिची आई दिसली.. अरुण.. त्याची आईही दिसली..

ती परत प्रशांत प्रशांत करून ओक्सबोक्शी रडू लागली.. अरुण विचार करत होता की “तिच्या जवळ जाऊ कि नको.. डॉक्टर तुषार तर अजून तीन दिवस शहराबाहेरच असणार होते.. ते नसताना योगिनी आपल्याला काही सांगेल का.. तिच्या अस्वस्थपणाचे कारण कळल्याशिवाय आपण तिची मदत करू शकणार नाही.. आता काय करायचे..” असे नानातऱ्हेचे प्रश्न अरुणच्या डोक्यात थैमान घालत होते..

योगिनी उठली आणि तोल सावरत.. हळूहळू चालत जाऊन अरुणला मिठी मारली.. अरुणला काय करावे सुचत नसतानाच ही अनपेक्षित गोष्ट घडली होती.. अरुणला काहीच कळत नव्हते.. पण त्याच्या डोळयांच्या कडा त्याच्याही नकळत ओलावल्या होत्या..

"अरुण अरे तुला माहीत आहे काय पाहिले मी स्वप्नात.. मी ज्या आठवणींपासून मुक्त झाले आहे असे मला वाटले तेच सर्व परत स्वप्नात दिसले.. "

अरुण, त्याची आई आणि योगिनीच्या आईचा आनंद गगनात मावेना.. योगिनीची हरवलेली स्मृती परत आल्याची ही चिन्हे होती..

योगिनी पुढे सांगू लागली "प्रशांत दिसला मला मृत्युशय्येवर.. रुग्णालयात अंतिम घटका मोजत असताना.. माझ्या समोर अखेरचा श्वास घेतला.. आणि मी त्याला वाचवण्यासाठी काही करू शकले नाही.." अरुणला बिलगून योगिनी खूप रडली.. अरुणने तिला मोकळे होऊ दिले.. तिला काहीही न बोलता हाताच्या आश्वस्थ स्पर्शाने थोपटून.. मायेने शांत केले..

चार दिवसांनी डॉक्टर तुषार त्यांची कॉन्फरेन्स संपवून शहरात परत आले.. त्यांना अरुणचा मेसेज दिसला..

त्यांनी अरुणला कॉल केला.. अरुणने कॉलवर त्यांना सविस्तर माहिती दिली.. डॉक्टर तुषारना खूपच आनंद झाल..

योगिनी त्यांना प्रशांत समजून जे वागत होती त्याचा आवाका दिवसेंदिवस वाढत होता.. आणि तिला समजावणे वरचेवर कठीण जात होते.. त्यांनी सुटकेचा नि: श्वास टाकला..

योगिनीची स्मृती परत आली होती.. प्रशांत या जगात नाही आहे हे तिने स्वीकरले होते.. डॉक्टरी पेश्याला साजेशी.. किंबहुना त्याहीपेक्षा माणुसकीच्या कक्षा रुंदावणारी कामगिरी डॉक्टर तुषारनी केली होती..

अरुण-योगिनीच्या अपार्टमेन्टकडे न येता डॉक्टर तुषार सरळ त्यांच्या घरी गेले.. त्यांचे कर्तव्य त्यांनी चोख पार पाडले होते..

अरुण दुसऱ्या दिवशी डॉक्टर तुषारना भेटायला गेला.. त्यांचे आभार मानण्यास साजेसे शब्द अरुणला सापडत नव्हते.. “तुमच्यासारखी माणसे या जगात आहेत म्हणूनच लोकांचा माणुसकीवरचा विश्वास अजून शिल्लक आहे.. आपल्या सर्व इच्छा पूर्ण होवो आणि आपली भरभराट होवो” या शुभेच्छांसह त्यांचे आभार मानून.. निरोप घेऊन अरुण घरी परत आला..

अरुण योगिनाला आता भारताची.. घराची.. बाबांना भेटण्याची ओढ लागली होती.. अरुण योगिनी महिन्याभरात अमेरिकेतील सर्व औपचारिकता पूर्ण करून आईबरोबर मायदेशी परतले..

विमानतळावर त्या दोघांचेही बाबा त्यांना रिसिव्ह करायला आले होते..

अरुण योगिनीला धडधाकट पाहून दोघांच्याही बाबांना खूप आनंद झाला.. योगिनीला बरेच दिवसांनी तिचे बाबा दिसले होते.. सगळयांचेच डोळे पाणावले होते..

दुराव्याच्या.. अपघाताच्या सर्व यातनांना अश्रू रूपाने बाहेर पाडण्यासाठी वाट मिळाली होती..

मनातील मळभ दूर होऊन आकाश स्वच्छ झाले होते..

अरुण योगिनीच्या आयुष्यातील काळोख दूर होऊन सूर्य हळूहळू क्षितिजावर आला होता.. त्याच्या सोनेरी किरणांनी अरुण योगिनीच्या आयुष्याचा कॅनव्हास व्यापून टाकला होता.. त्यांच्या नवीन आयुष्याच्या अरुणोदय झाला होता..

***** समाप्त *****

# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी सिनेमा हा एकेकाळी भारतात हिंदी सिनेमाच्या तोडीस तोड किंवा काकणभर वरचढच होता. मध्यंतरी मराठी सिनेमाला उतरती कळा लागली. प्रेक्षक येईना. म्हणून थिएटर मिळेना. थिएटरच मिळत नाही म्हणून चांगले मराठी सिनेमा बनेनात. आणि चांगले सिनेमा नाहीत म्हणून प्रेक्षक मिळेनात. असे एक दुष्टचक्र सुरू झाले. मग आला झी मराठी सिनेमा. आणि त्याच्याच जोडीने छोट्या आकाराची मल्टीप्लेक्स आणि डिजिटल प्रक्षेपण. त्यामुळे पुन्हा एकदा मराठी सिनेमा जोमाने बहरू लागला.

काहीशी अशीच परिस्थिती मराठी साहित्याचीही होत आहे. एकेकाळी टॉपला असलेले मराठी साहित्य मधल्या काळात टिव्ही आणि सिनेमाच्या युगात मागे पडले. पण आता मोबाईल आणि इंटरनेट यांच्यामुळे मराठी वाचकवर्ग फ़ार मोठ्या प्रमाणावर वाढतो आहे. आणि त्याच जोमाने त्यांच्यासाठी लिहिणारा दर्जेदार लेखक वर्गही निर्माण होऊ लागला आहे. मराठी साहित्याच्या भविष्याबद्दल आम्ही अत्यंत आशावादी आहोत.

आपली साथ मात्र पाहिजे. आपल्या ओळखीच्या जास्तीत जास्त लोकांना ई साहित्य बद्दल सांगा. त्यांचे ई मेल पत्ते व whatsapp नंबर कळवा. त्यांना ई साहित्यचं मोबाईल app download करायला सुचवा. आग्रह करा. ई साहित्यचे

मार्केटिंग करा. एकदम फ़्रंट फ़ुटवर येऊन खेळू. जबरदस्त मार्केटिंग करू. लाखांचे कोटी करू आणि मराठी साहित्य पुन्हा नंबर वन ला आणू.

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahitya.com

esahity@gmail.com

आता ई साहित्य चे APP उपलब्ध आहे ई साहित्यचं .App आपण खालील लिंकवरून आपल्या मोबाईलवर डाऊनलोड करा आणि भरमसाट पुस्तकं फ़्री वाचा.

https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks

ई साहित्य प्रतिष्ठानची ई बुक्स Whatsapp broadcast service सुरू झाली आहे.पूर्णपणे फ़ुक्कट पुस्तकं आता आपल्या मोबाईलवर थेट . कृपया नांव नोंदणीसाठी 7710980841 हा नंबर आपल्या मोबाईलवर सेव्ह करा आणि नंतर या नंबरवर वॉट्सऍप करून आपले नांव व शहराचे नांव कळवा आपल्याला नियमितपणे एक नवीन मराठी ई पुस्तक . Whats app द्वारे पाठवले जाईल आपण ते पुस्तक आपल्या मित्रांना .Whatsapp करा आणि भाव खा.

आपल्या ओळखीच्या किमान दहा लोकांचे मेल आय डी आम्हाला कळवात्यांना . व आपल्याला .आम्ही विनामूल्य पुस्तके पाठवू VIP सभासद बनवले जाईल.